# वसंत बापट

# सेतु

१८५८
स. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ७३६७

REFBK-0009403
REFBK-0009403

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 29883 वि:
क्रमांक 93.49 नों:

# सेतु

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८४०.२
(मूळ प्रत)

वसंत बापट

REFBK-0009403
REFBK-0009403

पॉप्युलर बुक डेपो, मुंबई ७

मूल्य तीन रुपये

प्रथमावृत्ति
वैशाख १८७९
मे १९५७

सर्व हक्क स्वाधीन

मुद्रक :
श्रीनिकेतन ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार
मुंबई २

प्रकाशक :
गणेश रामराव भटकळ
पॉप्युलर बुक डेपो
लॅमिंग्टन रोड
मुंबई ७

ग्रंथालय, ठाणे. स्थ
अनुक्रम ............ वि: ........
क्रमांक ........................ नों: दि: ........

# भूमिका

माझ्या काव्याची भूमिका मी स्वतःच मांडणार आहें खरा, पण ही फार अवघड गोष्ट आहे. एक तर मला माझ्याविषयीं नितांत आदर असल्यामुळें स्वतःच्या भूमिकेला नांवें ठेवणें मला मुळींच रुचणार नाहीं. उलट, विनयानें बोलावें ह्या कल्पनेची माझ्या मनावर जबरदस्त पकड असल्यानें आत्मगौरवालाहि थोडाफार मी मुकणार आहें. पण दुतर्फा उभ्या असलेल्या ह्या संकटांकडे दुर्लक्ष करून, जेवढें म्हणून आत्मनिरपेक्ष राहतां येईल तेवढें राहून माझ्या कवितेविषयीं कांहीं प्रपंच मी करणार आहें. वास्तविक कुठलाहि माणूस स्वतःकडे दुरून पाहूं शकत नाहीं. पाहिलें तर आरशांत पाहातो आणि तेंहि मीपणाचे सोस-सोहाळे पुरविण्यासाठीं. कलावंताला हा शाप विशेषेंकरून असतो. तात्पर्य एवढेंच कीं कितीहि अलिप्त राहीन म्हटलें तरी अलिप्ततेंत थोडेंफार सोंग शिरून ती शबल होणारच, हें विसरतां येणार नाहीं.

मी कविता कां लिहितों ह्याचें एकच एक उत्तर मला देतां येणार नाहीं. ह्याचाच अर्थ असा कीं, माझी काव्यविषयक भूमिका वारंवार बदलत आलेली आहे. इतकेंच नव्हे, तर एका वेळीं एक भूमिका ठेवण्याचेंहि मला जमलेलें नाहीं. रोमा रोलां ह्यांच्याप्रमाणें, 'मला लिहिलेंच पाहिजे म्हणून मी लिहितों', असें चक्रात्मक उत्तर मला देतां येईल; पण तेंहि पूर्णपणें खरें नव्हे. एक गोष्ट मात्र खरी आहे कीं, छंदांत बोलण्याचा छंद मला मुळांतच आहे. थोडेंफार नांव मिळालें कीं खऱ्याखोट्या आख्यायिका माणसाला चिकटतातच. सांगतों आहें तो प्रकार तशापैकीं नव्हे. वयाच्या सहाव्या सातव्या वर्षींच लयबद्ध रचनेचा चाळा माझ्या मनानें सुरू केला. कवीला प्रतीत होणारीं लयाचीं भिन्न रूपें म्हणजे छंद. लय म्हणजे मनाच्या अणुरेणूंतून भरलेली आणि कानांनीं नव्हे तर गूढ श्रवणेंद्रियांनीं अनुभवलेली वस्तु. छंद हा तिचा प्रकट उद्गार. छंदोमयी वाणीच्या वरदानाची जाणीव झाली त्या क्षणीं मी कवि झालों. अर्थात् छंद हें काव्याचें एक अंग आहे. प्रथम मला तेवढेंच जाणवलेलें होतें. अगदीं आपसूक जाणवलेलें होतें. छदाची संथा कधींच घ्यावी

लागली नाहीं. किंबहुना गुरुमुख येथें व्यर्थ आहे. ज्यानें छंदासाठीं गुरु केला, शास्त्र घोकलें तो चिरेबंद इमारत बांधूं शकेल; पण त्यांत रचनेसाठीं खूपच आटापिटा करावा लागेल. आळोखे-पिळोखे द्यावे लागतील. गणमात्रांचा ताळेबंद जमविणारांवर गडकऱ्यांपासून राजाध्यक्षांपर्यंत सर्वांनींच शस्त्र धरलेलें आहे. पण लय हा ज्याचा सहजधर्म आहे त्याला ताळेबंद कधींच जमवावा लागणार नाहीं. त्याच्या गणमात्रांचा ताळेबंद आपोआप जमणारच. देव जमवून चुकला आहे. त्यांचीं मोजमापें नंतर कोणी घेतील. त्यांत सूक्तासूक्त, शुद्धाशुद्ध ठरवतील. पण हा आटापिटा मला आजतागायत कधींच करावा लागलेला नाहीं.

लय माझ्यापाशीं होतीच. तिला जागृति आली ती मात्र विशिष्ट संस्कारांनीं. माझे वडील संस्कृत वाङ्मयाचे जाणकार रसिक होते. त्यांच्यामुळें संस्कृत वाङ्मयाची स्वर्गंगा माझ्या कानांवर सारखे गोड आघात करूं लागली. व्याकरणाच्या फंदांत पडण्यापूर्वींच कालिदासादिकांची लयदार शैली मला मोहवूं लागली. गीतेच्या पाठामुळें साध्या अनुष्टुभाचें सौष्ठव ठसूं लागलें. रघुवंशांत रघुराजा लिपिरूपी नदीमधून वाङ्मयाच्या समुद्रांत शिरला असें वर्णन आहे. मला एकदम समुद्राचाच परिचय झाला आणि त्याच्या पोटांत बाकी सगळें आलें असें वाटलें. इंग्रजी शाळेंत आल्यावर चार वर्षांनीं अकः सवर्णे दीर्घः आणि इको यणचि – हा मारा सुरू झाला. पण त्यापूर्वींच रघु-कुमार-मेघदूतांशीं, जगन्नाथाच्या दर्पोक्तींशीं, गीतेच्या हृत्स्पर्शी शैलीशीं माझा परिचय झालेला होता. ह्या परिचयाचे संस्कार मनावर झाल्याबरोबर आपणहि छंदांत लिहावें, तसें लिहिण्यांत विशेष आनंद आहे, हें समजूं लागलें. पुन्हां त्यांत अवघड असें कांहींच वाटत नव्हतें. अगदीं संस्कृत वृत्तांत म्हणजे पृथ्वी, मंदाक्रान्ता, शार्दूलविक्रीडितांत मी सहज रचना करूं शकें. त्यांत अक्षराची, लघुगुरूची, यतीची कसलीहि चूक कधीं झाली नाहीं आणि ती दुरुस्त करण्याचें श्रेयहि कोणाला मिळालें नाहीं. माझ्या ह्या शक्तीचें माझ्या शिक्षकांना कौतुकहि वाटे आणि त्यांना थोडी फार शंकाहि येत असे असें स्मरतें. पण छंदोबद्ध वाणीचें वरदान मला आपोआप लाभलें होतें त्याला मी

तरी काय करणार? मला ह्या शक्तीचा प्रथम साक्षात्कार झाला आणि नंतर अहंकार. माझ्या हातीं ही वॉशिंग्टनची कुऱ्हाड आली मात्र, मी ती सर्रास चालवूं लागलों. परीक्षेंतील अनुवाद पद्यांत करावे, वर्गबंधूंवर व शिक्षकांवर बऱ्याबाईट श्लीलाश्लील कविता कराव्या, अभ्यास लक्षांत ठेवण्यासाठीं विषयांच्या कारिका कराव्या, मंगल प्रसंगीं वा निधनप्रसंगीं गडकऱ्यांच्या भांबूरावाप्रमाणें कांहीं तरी लिहावें हा चाळा लागला; आणि संस्कृतच्या सौजन्यानें असल्या लिहिण्यांतहि प्रसाद व नादमाधुर्य येऊं लागलें. भोंवतालच्या मंडळींत त्याचेंच कौतुक असल्यामुळें, आपण कांहीं चुकतों आहोंत अशी चुकूनहि कल्पना येईना! ही स्थिति मी कॉलेजमध्यें प्रवेश करीपर्यंत होती.

आजहि माझ्या कवितेंत जर शैलीची सफाई असेल, नादगुण असेल तर त्याला कारण हें बालपणचें कवित्व. मी मुद्दाम घाटदार लिहितों, प्रास व यमकांचा हव्यास धरतों, अशी टीका माझ्यावर होते. पण ही गोष्ट मी जाणिवेनें घडवून आणीत नसून पूर्वसंस्कारांमुळें ती आपोआपच घडते. माझ्या कवित्वाचा किंवा माझ्यांतील कवीच्या व्यक्तित्वाचा तो एक अच्छेद्य भाग झालेला आहे. लालित्य हा कांहीं नित्य गुण नव्हे. तो नित्य दोषहि नाहीं. हें लालित्य आतां मला सोडीलसें वाटत नाहीं. त्याचा मला काव्यदृष्ट्या फायदाहि होतो आणि तोटाहि होतो. त्याचा माझ्या मनावर एवढा पगडा आहे कीं, कोणाच्याहि व कोणत्याहि कवितेंत तें नसलें तर मला ती कविता असुंदर आहे, भुंडी आहे असें वाटूं लागतें.

संस्कृत भाषेच्या वटवृक्षाचें सावट पडून माझें काव्य पार खुरटलें असतें. पण तसें व्हावयाचें नव्हतें. काव्यग्रंथांच्या वाचनामुळें माझ्या मनांत अष्ट-दिशांना खिडक्या उघडूं लागल्या आणि त्यांतून नाना प्रकारचा प्रकाश आंत शिरून एकच मजेदार गोंधळ उडाला. त्या संभ्रमांत मी किती तरी दिवस होतों. इंग्रजी काव्याची गोडी लागली आणि खऱ्याखुऱ्या भावकवितेचें दर्शन घडलें. मराठी आधुनिक कवितेशीं ओळखहि ह्याच काळांत झाली.

त्या वेळच्या सामाजिक स्थितीचा परिणामहि जबरदस्त झाला. राजकीय व सामाजिक स्वातंत्र्याला मुकलेला, सर्व क्षेत्रांत वंचित राहिलेला हा देश त्या वेळीं फार वेगानें ढवळून निघत होता. छोटींमोठीं आंदोलनें प्रत्यहीं घडत होतीं आणि मी तर ह्या सर्व घटनांच्या निकट सान्निध्यांत होतों. नव्यानें उदयाला येणाऱ्या आपल्या राष्ट्राच्या आकांक्षा, पीडितांचें दुःख, जगण्याची इच्छा, सगळें कांहीं जवळून पाहात होतों. संघर्षाच्या धकाधकींत प्रत्यक्ष पडलों होतों. ह्या सर्व घडामोडींचा परिणाम माझ्या व्यक्तिमत्त्वावर म्हणजेच कवीवर होणें अपरिहार्यच होतें. हा परिणाम इतका मोठा होता कीं, त्यामुळें पुष्कळ वर्षेंपर्यंत माझी कविताच केवळ नव्हे, तर माझी काव्यविषयक, एकूण वाङ्मयविषयक दृष्टिच बदलून गेली होती. जें समष्टीच्या भावनांचें प्रतिनिधित्व करतें, लोककल्याणासाठीं ज्याचा जन्म झाला आहे, जें निजले-ल्यांना उठवितें, उठलेल्यांना कार्यान्वित करतें तें साहित्य, अशी समजूत मीं करून घेतली. ‘ स्वान्तःसुखाय ’ हें तत्त्व ‘ बहुजनहिताय ’ ह्या तत्त्वानें झांकून टाकलें. त्यामुळें माझ्याहि काव्याला एक प्रयोजन निर्माण झालें. काव्याला काव्यबाह्य प्रयोजन असल्यानें काव्याची हानि होईलच असें नाहीं. पण रचनेची आशयावर कुरघोडी झाली म्हणजे जशी काव्याची हानि होते त्याचप्रमाणें पुष्कळ वेळां काव्याचें एखादें काव्यबाह्य प्रयोजन काव्यापेक्षां डोईजड होऊन बसतें. माझ्या कवितेला समाजनिष्ठेचें व समाजजागृतीचें बाह्य प्रयोजन निर्माण झालें. ज्या निर्मितींत माझी समाजनिष्ठा माझ्या व्यक्तिमत्त्वाशीं एकरूप झालेली होती त्या निर्मितींत कांहीं उणेपणा आला असें मला वाटत नाहीं. ह्याचाच अर्थ त्या त्या क्षणीं त्या बाह्य प्रयो-जनाची ( extraneous purpose ) काव्याच्या मूल प्रयोजनाशीं एक-तानता साधलेली असे. पण ह्या एकतानतेच्या अभावीं पुष्कळ वेळां मी स्वतःच्या सामर्थ्याचा गैर उपयोग करून प्रचारी साहित्य लिहिलेलें आहे.

काव्य ही सुद्धां एक महान् साधना आहे. अनुभूतीशीं प्रामाणिक राहा-ण्याचें खडतर तप कवीनें केलें पाहिजे ; तरच त्याला महान् साहित्याला जन्म देतां येईल. उलट, प्राप्त झालेल्या सिद्धींचा दुरुपयोग केल्यानें त्याच्या-

श्रेयांत मात्र वैगुण्य येईल. प्रथम मीं स्वयंभू छंदाचा दुरुपयोग केला आणि नंतर सामाजिक जाणिवेचा. ही माझी स्वतःच्या काव्याच्या दृष्टीनें हानि झाली. पण काव्यविषयक दृष्टिकोन बिनसला होता, ही अधिक मोठी हानि होती. ज्यांत सार्वजनीन भावना नाहीं, व्यक्तिगत अनुभूति आहे, तें साहित्य हिणकस अशी गैरसमजूत होऊन बसली होती. त्यामुळें माझें साहित्यजीवन एखाद्या माडाच्या झाडाप्रमाणें सरळसोट एकाच दिशेनें धावूं लागलें. केशवसुतांच्या प्रतिज्ञेप्रमाणें आपणहि बंडाची धामधूम उडवून द्यावी, 'पद्यपंक्तिची तरफ' हातांत घेऊन 'जग उलथुनियां' टाकावें, असा आविर्भाव सुचूं लागला. तो सर्वस्वीं खोटा नव्हता. पण दुसऱ्या अनुभवांनाहि अर्थ आहे, दुसरे अनुभवहि महत्त्वाचे आहेत, किंबहुना अधिक महत्त्वाचे आहेत, हें आज मला समजतें आहे. सामाजिक जाणीव तीव्रतेनें होऊं लागली तरीसुद्धां भोंवतालच्या परिस्थितीचें वस्तुनिष्ठ चित्र काढणारी कविता ही तात्कालिक स्वरूपाचीच ठरते. ती पद्यमय चर्पटपंजरी आहे. तो तपशिलांचा पोवाडा आहे. वस्तुनिष्ठेच्या पलीकडे जाऊन तपशिलांचा रवंथ न करतां सर्व लोकांच्या हर्षशोकांचा ठाव घेत घेत आणि स्वतःच्या व्यक्तित्वाची डूब देत देत जी निर्मिति होईल ती शाश्वत ठरूं शकेल. सामाजिक जाणिवेची परिणति व्हावयास हवी ती अशा कवितेंत. रामायण, महाभारत व संतवाङ्मय ह्यांत अशी परिणति झालेली आहे. त्रुटित अशा कांहीं भावकवितांतहि ती होऊं शकेल. पण साधारणपणें सामाजिक जाणीव हा शब्द फार ढोबळ अर्थानें वापरला जातो. माझ्या बाबतींत तो ढोबळ अर्थानेंच वापरतां येईल.

आजच्या माझ्या काव्याची भूमिका स्पष्ट होण्यासाठीं हा पूर्वेतिहास व हें विवेचन आवश्यक आहे. काव्याच्या ह्या प्रथमावस्थांतून बाहेर पडतांना मला प्रयास पडले असले तरी आतां मी बाहेर पडलों आहें असें मला वाटतें. माझ्या विकासाच्या मार्गावरील कांहीं टप्पे मीं मुद्दाम दिग्दर्शित केले आहेत. माझ्या कवितेच्या बाल्यावस्थेबद्दल मला कधीं पश्चात्ताप होत नाहीं. कारण त्यांतून जें घेण्यासारखें होतें, टिकवण्यासारखें होतें तें मीं जगवलें आहे, टिकवलें आहे असें मला वाटतें. पद्यरचनेचा हव्यास सोडून दिला

आणि शब्द वाकवण्याची शक्ति शिल्लक ठेवली. प्रचारी साहित्याकडे पाठ फिरवली; निदान त्याची काव्यक्षेत्रांतून माझ्यापुरती हकालपट्टी केली. प्रचार हेंहि साहित्याचें एक दालन असलें तरी तें काव्यापासून फार निराळें आहे हें शिकलों; पण तरीहि समाजाच्या सुखदुःखांकडे पाठ फिरविण्याची भूमिका मला घेणें जमणार नाहीं; रुचणार नाहीं. सर्वत्र अपार कारुण्य भरलेलें आहे तें मला दिसतें आहे तोंवर मी डोळे मिटून घेणार नाहीं. माझ्या काव्यांत समाजाच्या आशानिराशांना फार मोठी जागा आहे व अजूनहि राहील. मनुष्यजातीवर येणारीं प्रचंड संकटें, होणारे प्रचंड आघात ह्यांपासून स्वतःला दूर ठेवण्याचें कसब मला साधणार नाहीं. पण तरीहि आशानिराशा, संकटें वा महोत्सव ह्यांची यादी करणें, किंवा तोडगे सुचविणें हें माझ्या काव्याचें कार्य होऊं शकणार नाहीं. माझ्या काव्यांत कोणतीहि विशिष्ट विचारप्रणाली, अमुक एक वाद, पंथ, मठ निर्माण होणार नाहींत. ज्या त्या क्षणीं माझ्या मनाचे जे जे रंग असतील ते ते मी उधळीत राहीन. आतां माझी कविता केवळ तात्पर्याला वाहिलेली नाहीं. सौंदर्याचे, भावनांचे जे जे रसोल्लास माझ्या मनांत आनंद निर्माण करतात त्यांची त्यांची मी कविता निर्माण करतों. माझ्या कवितेंतील किंवा काव्यविषयक भूमिकेंतील फरक दर्शविणारी पहिली कविता ' केवळ सौंदर्य, केवळ आनंद ' अशा प्रारंभाची आहे. कर्मकटकटी आणि संघर्ष, आपला लोभीपणा आणि मानसिक सुस्तपणा ह्यांच्या आवर्तांत सांपडल्यावर जीवनांतील प्राथमिक, मूलभूत अशा आनंदालाहि आपण मुकतों. कळाहीन सुतकी बनतों. त्याविरुद्ध माझी कैफियत त्या कवितेंत मीं मांडली आहे.

पांच नद्यांतून मनःसागरांत
आनंद जळाचे पूर भरतात
पंच रंगांच्या या इंद्रधनुष्यांत
चित्तचंडोल हो भरारी घेतात
पांच राजहंस माझ्या पालखीला
उचलती उंच आनंदमयांत

जय शब्द स्पर्श रस रूप गंध
केवळ सौंदर्य केवळ आनंद

असा ऐंद्रिय सुखाचा व एकूण जीवनानंदाचा जयजयकार मीं केला आहे. पण एकापरीनें सौंदर्याचा व आनंदाच्या अनुभवांचा झाला तरी तो पोवाडाच आहे. हटातटानें तत्त्वज्ञान बोलत राहाण्याचा माझा खटाटोप कसा व्यर्थ होता हें ‘ फकिराची फिर्याद ’ मध्यें मीं चित्रित केलें आहे.

‘ शिवाहुनी शिव मी, अनंग जाळियला ’ अशा घमेंडींत मी होतों खरा ; पण कोणाची तरी स्खलन्त गति माझे डोळे पुन:पुन्हां खेंचीत होती. प्रकृतीची स्खलन्त गति मला मोहवीत होती आणि संस्कार मला वेगळाच ढंग घ्यावयास भाग पाडीत होते. ह्याविरुद्ध माझ्या मनाची पहिली जोरदार प्रतिक्रिया बाहेर पडली ती एका किंचित् कूट पण अर्थदृष्ट्या सघन अशा कवितेच्या द्वारां :

उल्लंघुन कक्षाकारा, मी निखळुन पडलों तारा
मज नव्हता आणिक नको कधींच किनारा
मी अपवादाचा यात्री, मी तर्करवीची रात्री
मीं जन्म घेतला गाधिजमुनिच्या गोत्रीं
मी सूत्राविण वर सरतों, मी अतलनभीं भिरभिरतों
मी जाइन तेथें खपुष्प वेंचित फिरतों
मी अहेतुकाचा हेतु, मी अपार्थिवाचा सेतु
मी धूमकेतुच्या वंशाचा जयकेतु

माझ्या मनाच्या घडणींत झालेल्या संपूर्ण क्रांतीची ही ग्वाही आहे.

मागणीप्रमाणें पुरवठा ह्या वचनाचे वेगवेगळे अर्थ होऊं शकतील. ‘ अर्थकृते ’ काव्य करणारा राजकवि हा राजदरबाराच्या मागणीप्रमाणें लिहितो. ‘ काव्यं यशसे ’ आहे असें मानणारा कवि लोकानुरंजनासाठीं लोकांना हवी तशी रचना करीत असतो. त्याचप्रमाणें मांगल्य, बोध म्हणजे एकंदरींत सत्यशिवाची पूजा बांधणारा कवि हासुद्धा एक प्रकारें काळाची

मागणी असेल तसा पुरवठा करीत असतो. पण जो आनंदनिर्मितीसाठीं लिहितो त्याच्या कृतींत शब्दांना नवें सौंदर्य प्राप्त होतें. परनिर्वृति म्हणजे हा परम आनंद हेंच काव्याचें प्रयोजन आहे अशी माझी निष्ठा आतां झाली आहे. त्यामुळें माझी जाणीव मुक्त झाली आहे.

वेदान्ताच्या उद्घोषांत
तुझें काढितों मी चित्र
आणि तुझ्या सान्निध्यांत
बोले वेदान्त परत्र

ही माझ्या मनाची संभ्रमावस्था संपल्यामुळें मी माझ्या अनुभूतीशीं प्रामाणिक राहूं शकतों. माझी जाणीव मुक्त झाल्याची जाणीव होतांच मला इतका आनंद झाला कीं रानपांखराप्रमाणें ' हिरव्या कवळ्या झुबक्यांवरती ' झोके घ्यावे व त्यावर आपल्या गीतफुलांचे झेले फुलवावे असें वाटूं लागलें. प्रेमाच्या, प्रणयाच्या, विभ्रमाच्या वेगवेगळ्या छटा मनांत जाग्या होऊं लागल्या. मनामध्यें अमुक एक विषय घेऊन कविता लिहिणें बंद झालें. एक मध्यवर्ती कल्पना आणि बाकीचा तिचा फुलोरा, तिचे वस्त्रालंकार, छतें झालरी असला साजशृंगार संपला. निसर्गांतील स्पंदनें नव्यानें जाणवूं लागलीं. मनाच्या अनेक स्मृति, भिन्नभिन्न अनुभव, वस्तुमात्राचीं व्यक्तिनिष्ठ दर्शनें व आत्मकेंद्रित संस्कार ह्यांचें कांहीं वेगळेंच रसायन निर्माण होऊं लागलें. फुलांतील फूलपणा तर जाणवूं लागलाच; पण त्याबरोबरच त्याच्याशीं संलग्न अशी जाणीव ( association ) मनांत घर करूं लागली. 'सेतु', ' बाभुळझाड ' अशा अनेक कवितांत ह्या नव्या निष्ठेचीं दर्शनें घडतील.

काव्याच्या निर्मितीविषयीं थोडें विवेचन केलें तर येथें तें अप्रस्तुत ठरणार नाहीं. अमुक एक विषय आणि त्यावरील कविता हें नातें जोंपर्यंत होतें तोंपर्यंत त्या त्या कवितेंतील एखादी चमकदार वाटणारी कल्पना मनांत घोळत राही. ती पिंजण्याचें काम मनांतल्या मनांतच होत राही. त्या कल्पनेच्या केंद्रीभूत अणूभोवतीं सदृश कल्पनांचे दुसरे अणू येत; एकवटत;

मनांतल्या मनांतच त्यांच्या सांखळ्या जुळत ; आणि तें सारें मोहोळ नादमधुर शैलीनें मी भरून टाकी. त्या कवितेंत एक प्रकारची निरिंद्रिय ( inorganic ) वाढ असे. त्यानंतर दुसरा एक अनुभव येऊं लागला. एकाद्याच कल्पनेचें बीज असा कांहीं जोर धरी कीं, त्या बीजांतूनच कोंभावर कोंभ यावेत तशा प्रतिमांच्या सरी निघत. ही एक प्रकारची सेंद्रिय ( organic ) वाढ म्हणतां येईल. ही अधिक एकात्म असे. ह्यांतील कल्पना म्हणजे केवळ एकमेकांना साहाय्यक ( corroborative ) नसत. त्या सगळ्या मिळून एक चित्र निर्माण करीत. अलीकडे सबंध कवितेचेंच गर्भरूप मनांत एकदम निर्माण होतें आणि त्याच्या भोवतीं मन घिरट्या घेत राहातें. मग पुरेसा विकास झाला आहे असें वाटलें कीं कविता मी लिहून काढतों. ह्या शेवटच्या प्रक्रियेंत जाणिवेची तीव्रता सर्वांत अधिक राहाते. पण पहिल्या दोन प्रक्रियाहि मला सोडून गेलेल्या नाहींत. पुष्कळ वेळां अर्धपक्क कल्पना वा भावना कागदावर उतरतांच तिच्या अस्तित्वानें धिटावलेल्या, मनांतल्या दुसऱ्या भावभावना आपोआप शब्दरूप घेतात. परिष्करण मी सहसा करीत नाहीं. पण तें करावयास हरकत कां असावी हें मला कळत नाहीं. एवढी कारागिरी कलेला मंजूर असावी.

रस, कल्पना व भावना ह्या सर्वांच्या पलीकडे एकूण सर्वच मराठी कविता गेली आहे. जाणीव म्हणा किंवा वस्तुजाताविषयींची आत्मकेंद्रित अनुभूति म्हणा हीच काव्याची जननी आहे. माझी कविताहि ह्याला अपवाद नाहीं. ज्या त्या कवीचें बाह्य जीवन, भावविश्व, जीवनदृष्टि, सौंदर्यकल्पना ह्यांत फरक पडत असल्यामुळें मराठी कविता एखाद्या विचित्रवीणेसारखी होईल आणि तिच्या शेकडों तारांत माझीहि एक तार असेल, अशी मला आशा आहे.

वसंत बापट

## अनुक्रम


सेतु १
जपावयाला शिकली होतिस ३
स्मरतें तुजला ४
अजून ७
फुंकर ८
विस्मृति ११
विचार तें १३
धुकें १४
कसें सांगूं तुला १५
अपरूप १७
फितूर १८
नाटक १९
बहाणा २०
आमंत्रण २१
खूण २३
कर्णफुलें २४
आशय २५
समजावणी २७
तूं तिकडे २८
आज अचानक २९
सोड तुझें स्फटिकाचें मंदिर ३१
नको हा संथ संकोच ३२
दुःख ३३
निचिंत ३४
जर का पटता शब्द ३५

सुनीत ३६
शहाणी ३७
डेलिया ३८
संवाद ३९
सरली झिम्मड ४६
रानपांखरा ४७
छंद ४९
होडी ५१
सांखळी ५३
शिणलेलें आभाळ ५४
नदी ५५
बाभुळझाड ५७
आज कळे ५८
वैशाख – १ ५९
वैशाख – २ ६०
एक डोळा आणि एक डोळा ६१
मुखवटा ६३
गरुड ६७
विनोबा ७१
केवळ माझा सह्यकडा ७३
गोरी ७६
वय वर्षें सोळा ७७
रंगानें तूं गव्हाळ ७८
नाजुक रुपडें ७९
ऋतुराजांनो ८०
प्रियंवदा ८९

# सेतु

...मी अहेतुकाचा हेतु
मी अपार्थिवाचा सेतु...

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम २१८८३ दि: ९.१.०४
क्रमांक ६३५९ नों: दि: ९.६.६८

# सेतु

शरदामधली पहाट आली तरणीताठी
हिरवेहिरवे चुडे चमकती दोन्ही हातीं
शिरिं मोत्यांचें कणिस तरारुन झुलतें आहे
खांद्यावरतीं शुभ्र कबूतर खुलतें आहे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ६४०३
स्थल प्रत

नुक्तें झालें स्नान हिचें तें राजविलासी
आठ बिचाऱ्या न्हाऊं घालित होत्या दासी
निरखित अपुली आपण कांती आरस्पानी
थबकुन उठली चाहुल भलती येतां कानीं

उठली तों हिज जाणवलें कीं विवस्त्र आपण
घे सोनेरी वस्त्र ओढुनी कर उंचावुन
हात दुमडुनी सांवरतां तें वक्षापाशीं
उभी राहिली क्षण ओठंगुन नीलाकाशीं

लाल ओलसर पाउल उचलुन तशी निघाली
वारा नखरे करीत भंवती रुंजी घाली
निळ्या तलावाघरचें दालन उघडें आहे
अनिश्चयानें ही क्षितिजाशीं उभीच राहे

माथ्यावरतीं निळी ओढणी तलम मुलायम
गालावरतीं फुलचुखिनें व्रण केला कायम
पायाखालीं येइल तें तें खुलतें आहे
आभाळाची कळी उगीच उमलते आहे

झेंडू गेंदेबाज गळ्याशीं बिलगुन बसले
शेवंतीचें स्वप्न सुनहरी आजच हसलें
निर्गंधांचे रंग पाहुनी गहिरे असले
गुलाब रुसले, ईर्ष्येनें फिरुनी मुसमुसले

फुलाफुलांची हनु कुरवाळित अल्लड चाले
तृणातृणांशीं ममतेनें ही अस्फुट बोले
वात्सल्य न हें—हेही यौवनविभ्रम सारे
सराइताला समजावे हे मुग्ध इशारे

दिसली ही अन् विस्फारित मम झाले नेत्र
स्पर्शानें या पुलकित झालें गात्र नि गात्र
ही शरदांतिल पहाट...कीं...ती तेव्हांची तूं ?
तुझियामाझ्यामधें पहाटच झाली सेतू ?

## जपावयाला शिकली होतिस

जपावयाला शिकली होतिस सारें कांहीं
कांठ जरीचा श्वासानेंही ढळला नाहीं
मोजित होतिस शब्दांमधल्या छटाछटांना
करायचिस तूं शिक्षा अपुल्या स्वैर ब्रटांना
समजत होती तुला जगाची सारी भाषा
झांकायाला शिकली होतिस अटळ निराशा

शैशव माझें सरलें होतें, सरलें नव्हतें
सारें कांहीं कळलें होतें, कळलें नव्हतें
नुकते होते स्वप्नपऱ्यांना फुटले पंख
अभिलाषेचा जरा कुठें झालेला डंख
केळीवरच्या दंवापरी मन हळवें होतें
पडायचें प्रतिबिंब त्यामधें भलतें-सलतें

वाटायाचें तुला कळावी सर्व इमानी
वाटायाचें करावीस तूं कुजबुज कानीं
बघत राह्यचा शिंपेतिल मी श्यामल तीळ
दिवस दिवस मी घुमवायाचा कर्कश शीळ
गाल द्यायचा कुस्करण्या कधिं तुझ्या करांत
उगीच लाजुन लपायचा मी माजघरांत
समजत होतें जरी तुला हें सारें कांहीं
"वेडा कुठला" म्हणायचिस तूं, दुरून तेंहि

आज मला तें आठवतें, मी मलाच हसतों
आठवतां तें अजून परि मी माझा नसतों

## स्मरतें तुजला ?

स्मरतें तुजला
शैशव अपुलें मनहारी चंदेरी ?
हसूरुसूंचा गंगाजमनी शेला
नकळत विणला दोघांनीं दोघांनीं ...
मांडव रचिले
तरल धुक्याच्या रंगाचे अंगाचे
ज्यांत लाविलीं स्वयंवरें थाटाचीं
नल-दमयंती, सीता-रघुराजांचीं ...
मात्र राहिलें
सदैव अपुलें अकलंकाचें नातें
शेजाऱ्यांनीं म्हटलें कांहींबाही
मात्र आपुली अभंग होती वाणी
भाउविजेला
जन्मवरी करुं मनोमनीं आठवणी

स्मरतें तुजला
विवाहमंगल तूझें ?
उभी तुझ्या पाठीशीं होतें
सजलकुंभ सुखसजललोचना
तुझी करवली.
हेवा केला बहिणींनीं बहिणींनीं
निरखियलें अन् मला नव्या वहिनींनीं
कुतूहलानें हलाहलासह किंचित्
मात्र आपुलें
सदैव होतें अकलंकाचें नातें

मात्र आपुली अभंग होती वाणी
भाउबिजेला
जन्मवरी करुं मनोमनीं आठवणी

स्मरतो का परि
तुझा कालचा अर्धस्फुट निःश्वास ?
स्मरते का ती थरथर तव अधरींची ?
स्मरतो का तो अडखळलेला शब्द ?
स्मरतो का तो स्पर्श चोरटा ?
निःश्वास तुझा
स्पर्शुन माझ्या कानाच्या पाळीला
उडवुन गेला कुरळ कुन्तलां भालीं
उडवुन गेला
शैशव अपुलें मनहारी चंदेरी ...
हंसूरुसूंचा गंगाजमनी शेला ...
उडवुन गेला सुखस्मृतींचे रंग

निःश्वासाचा एक इशारा होतां
गिळलें माझें चक्र भुईनें काल ...
कवचकुंडलें माझीं लुटलीं लुटलीं.
पांचालीसम
ऐन जगाच्या बाजारीं उघडी मी
आतां नाहीं खरेंच वाटत मजला
कीं कृष्णाची बहीण होती कृष्णा
अन् रामाची सीतेवरली प्रीती ...

स्मरूं नको रे
शैशव अपुलें मनहारी चंदेरी ...
स्मरूं नको ते गंगाजमनी शेले ...
स्मरूं नको ते मांडव तरल धुक्याचे
स्मरायचा तो आतां एकच श्वास !

# अजून

अजून त्या झुडपांच्या मागें
सदाफुली दोघांना हसते
अजून अपुल्या आठवणींनीं
शेवंती लजवंती होते

तसें पहाया तुला मला ग
अजून दंवबिन्दू थरथरतो
अर्ध्यामुर्ध्या कानगुजास्तव
अजून ताठर चंपक झुरतो

पाठ आठवुन तुझी विलोरी
अजून हिरवळ हिरमुसलेली
चुंबायाला तुझीं पावलें
फूलपांखरें आसुसलेलीं

अजून गुंगीमधें मोगरा
त्या तसल्या केसांच्या वासें
अजून त्या पात्यांत लव्हाळी
होतच असतें अपुलें हासें

अजून फिक्कट चंद्राखालीं
माझी आशा तरळत आहे
गीतांमधलें गरळ झोकुनी
अजून वारा बरळत आहे...

## फुंकर

बसा म्हणालीस, मी बसलों
हसलीस म्हणून हसलों
बस्— इतकेंच...
बाकी मन नव्हतें थाऱ्यावर

दारावरचा पडदा दपटीत
तूं लगबग निघून गेलीस
माजघरांत
माझ्या सोबत ठेवून
तुझ्या सुस्त संसाराच्या निशाण्या...

या जाळीच्या पडद्यांत
कशाला कोरलें आहेस
हें हृदय, उलटें, उत्तान !...
कांचेच्या कपाटांत
कशाला ठेवल्या आहेस
भुश्श्याच्या राघूमैना ?...
उडताहेत लाकडी फळांवर
कचकड्याचीं फुलपांखरें
भिंतीवर रविवर्म्याचीं पौष्टिक चित्रें हारीनें.

काळ्या मखमलीवर
पतीच्या नांवाचा रेखीव कशिदा —
त्यांतला एक टांका जरी चुकली असतीस
तरी मी धन्य झालों असतों.

तूं विचारलेंस, काय घेणार ?
काय पण साधा प्रश्न —
काय घेणार !
देणार आहेस का तें सारें — पूर्वीचें ?
मला हवे आहेत
चिंचेचे आंकडे — ते
ते अधाशी ओठ, ती कुजबुज, त्या शपथा !
दे झालं कसलंहि साखरपाणी.

तुझं आणि तुझ्या पतीचं हें छायाचित्र
छान आहे.
तुझ्यावरची सारी साय
या फुगीर गालांवर ओसंडते आहे.
बळकट बाहू, रुंद खांदे
डोळ्यांत कर्तेपणाची चमक
छान आहे.
राग येतो तो तुझा
या चित्रांत तूं अशी दिसतेस
अशी दिसतेस कीं
जसें कांहीं कधीं झालेंच नाहीं !

मी तुला बोलणार होतों
छद्मीपणानें
निदान एक वाक्य, एक जहरी बाण, निदान एक
तें मला जमलें नाहीं, आणि
तूं तर नुसती हसत होतीस

आतां एकच सांग,
उंबऱ्यावर तुझ्या डोळ्यांत पाणी आलें —
इतकी का तुला सुपारी लागली ?
पण नकोच सांगूंस
तेवढीच माझ्या मनावर
एक फुंकर.

… ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 29553 वि: ८०२०९१
क्रमांक ... 93५9 नों: दि: २८।६।५६

# विस्मृति

छे ग ऽ...आतां कशी रहावी
स्मृती मला तेव्हांची सगळी ?
होता का ग ऽ चंद्र तेधवां,
कीं होती ती रात्र वादळी ?

भिजल्या रानावरून तेव्हां
आला होता मातट गंध ?
कीं घमघमला होता तेव्हां
तुझा मोकळा कुंतलबंध ?

चंद्रकळा होतीस नेसली...
चुकलों ना ? छी...कसा विसरलों...
जास्वंदीची चुनडी ? नाहीं ?
तूंच सांग...मी पुरता हरलों.

मात्र एवढें स्मरतें आहे...
होता त्याचा पोत रेशमी !
कां डोळे करितेस एवढे ?
चुकलों का ग ऽ सांग पुन्हा मी ?

कानांमधलीं तुझीं कुंडलें
सल त्यांची माझ्या गालावर...
मलाच उलटें म्हणालीस तूं
असा कसा होतोस अनावर !

म्हणालीस का—
    कीं हे सारे
माझ्या मनचे उनाड चाळे ?
सांग काय कुजबुजलों आपण ?
विसरलीस का तूंही सगळें ?

होतिस ना तू फुलें माळलीं ?
नाहीं ? आठव नीट जराशी...
मला वाटतें बकुलफुलांचा
गजरा होता तुझियापाशीं...

साधी होतिस तरी त्या दिशीं
लाविलेंस वाळ्याचें अत्तर
नाहीं ? मग हा संभ्रम माझा...
तुझाच किंवा ? मीच निरुत्तर

एक मात्र आठवतें **निश्चित**
पहाट झाली होती लौकर
भिजलें होतें भाळ **दंवानें**
कांटा फुलला अंगांगावर

माझा कोट तुझ्या खांद्यावर
शाल तुझी अन् माझ्या देहीं
चुकलों का मी पुन्हा ? सांग मग
कशी भासली थंडी नाहीं ?

## विचार तें

ओढ्यावरतीं झुकल्या फांद्या
वळणावरतीं खचला पूल
तिथेंच होता रुतला कांटा
तिथेंच होतें चुरलें फूल
विचार तें त्या वृद्ध वडाला

जरा पुढें अवघडल्या वेली
जरा पुढें झुकलें वेळूबन
तिथेंच झाली धन्य धरित्री
कृतार्थ झाला तिथें निळा घन
विचार तें त्या सैल झऱ्याला

ढासळलेला बुरुज पुराणा
कलंडलेली भिंत जराशी
तिथें उगवला पिंपळ हळवा
तिथें फुलांच्या दबल्या राशी
विचार तें त्या भग्न तटाला

जिथें दिशांचीं बुजलीं नांवें
जिथें नभाचें उजळे भाल
तिथेंच ढळली होती तारा
तिथेंच झाला चंद्रम लाल
विचार तें त्या खिन्न नभाला

जिथें मिठींतच दिठी निमाली
तुला न तूंपण मला न मीपण
तिथेंच होतों जगलों क्षणभर
तिथेंच सार्थक केलें आपण
विचार तें ह्या सुन्न मनाला...

## धुकें

जागरणाची रात लहानी
जरा कुठें ओसरली होती
झुंजुरक्याच्या लाटेखालीं
जरा कुठें गहिवरली माती

धुसमटलेल्या अंगांगांवर
जरा कुठेंशी झुळुक चावरी
तांबरल्या डोळ्यांतिल निजली
जरा कुठें ती हाव हावरी

धमनीच्या रक्ताची आणिक
जरा कुठें ओसरली भरती
धुकें होउनी मुकें पडावें...
ओशाळुन मी वक्षावरतीं

इतुकें होउन दयामयी तूं
धुक्यांतल्या धरतीपरि ओली
इतुकें होउन, बाळ तुझा मी...
कणव दंवापरि खळकन् गळली.

## कसें सांगूं तुला

कसें सांगूं तुला ... वाटे
मला भय अनामिक
चुकून हा फुटेल ग
माझा बांध अगतिक

आहे इतुका निष्पाप
तुझा खळाळता हर्ष
माझ्या किल्मिषाचा त्याला
नको गडे व्हाया स्पर्श

शब्द बेसावध एक ...
एक हावरें पाऊल ...
सूड घ्यावया टपली
गतकाळाची चाहूल !

जाड शिष्टाचा बुरखा
दगा देईल हा कधीं ...
अशी भीती उरीं माझ्या
सुरी घाली कधींमधीं

तुझ्या भाळींच्या भाग्याची
पुरी जाणीव असून
चोरटी ही आशा माझी
पाही थोडें चांचपून

...आणि कधीं कधीं होते
अशी उरीं घालमेल...
माझ्यापरी तुलासुद्धां
पाप चेतना देईल ?

## अपरूप

उदी टेकड्या खुरटीं झाडें
मुरमाडाच्या ढिसूळ वाटा
कळंजलेला रोड गुराखी
मथ्थड ढोरें, बथ्थड घंटा

निवडुंगाच्या फडा मोडक्या
भुरशापरि पसरले सराटे
सरपटणाऱ्या सरड्याचे अन्
फरपटलेले चार फराटे

बिनतेलाच्या झिंज्या चिवडित
दावित कुणि कथिलाच्या वाकी
तिला पाहुनी शीळ घालते
खडखडणारी एक दुचाकी

करडी छाया आभाळाची
कळाहीन धरतीचीं गात्रें
उबग जिवाचा यावा सहजीं
या दृश्याच्या दर्शनमात्रें

उफराटे परि माझे डोळे
उचलुन बघती ओंगळ पडदा
एक तपापूर्वी फुललेली
अपरूपाची रूपसंपदा...

## फितूर

फितूर झाला वारा आम्हां
पार उडाला तट जास्वंदी
कसे राखतिल बालेकिल्ले
तलम तुझे हे स्वारशिबंदी

हा जास्वंदी वारा लागुन
चंद्रम झाला लालम् लाल
लाज जांभळा दर्या तुजला
पाणजुईचें देई फूल

भलत्या वेळीं भलत्या ठायीं
भलतेंच तुझें आहे साहस
जोरावर परि दैव तुझें कीं
सालस आम्ही असे निखालस !

## नाटक

हसतां हसतां तसा जिव्हाळा
हसतां हसतां घाव जिव्हारीं
असावधाला वधून गेलें
तुझें अशिल्पित शस्त्र दुधारी

गळामिठीचा भोंवळभंवरा
ताटातुटिची धार भयानक
अजूनही उलगडलें नाहीं
बुडलों केव्हां कसा अचानक

पाप तुझें निष्पापच आहे
रक्ताचे ते सहज इषारे
पुन्हां एकदां...एकदांच तूं
करशिल का तें नाटक सारें ?

पुन्हां एकदां भान विसरुनी
मान तुझ्या हातीं निरवावी
हसतां हसतां भाळ चुंबुनी
सुरी सुखानें तूं फिरवावी...

## बहाणा

मनाला ज्या कळा माझ्या कळाव्या त्या तुला एक
स्मितामागील जाणावे तुवां ते गूढ उद्रेक
तुझे माझे जरी डोळे मनींचें बोलती गूज
कळालें तें न कळल्याचा बहाणा चालतो रोज

व्यथा कां सांगतां येते कुणाला चारचौघांत
परी तूं टाळसी मोठ्या खुबीनें सख्त एकांत
कथा मी सांगतों कांहीं पटाया आंतला अर्थ
कळालें तें न कळल्याचा बहाणा चालतो व्यर्थ

किती निष्पाप भोळी तूं! अहाहा तूं खरी मुग्धा!
पुरे हें सोंग मायावी...वृथा मीं घेतलें छंदा...
असा येतो तुझा राग; परी ती ना तुला पर्वा
तुझा तो छंद छळण्याचा...तयाला अंत ना ठावा

बहाण्यानें शहाण्याला अशी तूं लाविशी ओढ
कळे हें, तें न कळल्याचें वरी मी पांघरी वेड

## आमंत्रण

ही खळखळणारी गंगा
वर विजन वनांतिल घाट
ते हिरवे पर्वत मागें
वर चुळबुळणारी वाट

चन्द्रांतुन चंदन खिरतें
उन्मनस्क सारे साग
तो पिसाट फिरतो वारा
जणुं झपाटण्या वनभाग

ऐकतात रानफुलें हीं
रेतीची झुरुमुरु बोली
मावळता घंटानाद
आर्तीत आरती भिजली

जें हवेहवेसें होतें
तें इथेंच विरघळलेलें
जें नकोनकोसें झालें
तें इथेंच दूर पळालें

या इथेंच झालें गेलें
वाटतें जाहलें वांया
ही अर्धोन्मीलित दृष्टी
लागते परोक्ष पहाया

परि लाख योजनांवरुनी
ओलांडुनि सात पहाड
आमंत्रित कंकणनाद
ठोठावत येइ कवाड

ती असतांनाची जादू
ती नसतांनाची ओढ
तें असण्यानसण्याहून
आगळेंच अपुलें वेड.

# खूण

वेल जुईचा दारिं तिच्या
... (असतो लाख ठिकाणीं)
ओटीवर झुलतो झूला
... (त्यांत नवी न निशाणी)

माडीवरतीं पुढति जरा
फिकट निळ्या खोलींत
गुणगुणते आहे गुणिला
... (तुमचें परिचित गीत)

कधिं झुळुकीच्या बोटांनीं
विणते लोकर-धागे
(जसे ईव्हनें बागेंत
विणले होते मागें)

मेजावरतीं बकुळ-फुलें
सुकलेलीं ... ओघानें ...
अश्रूंची अन् हिमसरिता
मुं .. गी .. च्या .. वे .. गा .. नें ..

एकच खूण तिथें न्यारी
वळचणिच्या कौलांत
घुमत पारवा आहे जो
तें तर माझें भूत !

# कर्णफुलें

कर्णफुलें हीं उरलीं हातीं
तींही दुखरीं व्याकुळलेलीं
तळहातांना सांगत बसती
चोरुन गुपितें ऐकियलेलीं

चलाख यांतिल लाल माणकें
बुद्धी त्यांची मोठी तल्लख
अजुन सांगती माझ्या ओठां
एक तपापूर्वीची ओळख

कधीं कधीं लाडांत येउनी
कुरकुर करती उगाच बेटीं
म्हणती स्मरतां दिन पूर्वीचे
हाय खुपे ही मखमलपेटी

कधिं हृदयाशीं घेउन त्यांना
मोजित बसतों रात्रीचे कण
आणि सकाळीं बघतों ... त्यांच्या
मुद्रा उरिं मज देती दूषण

कधिं रागानें म्हणतों त्यांना —
' विसरलांत त्या कुंतललहरी ? '
त्यांचें उत्तर जाळी अंतर
संध्येच्या थरथरत्या प्रहरीं !

## आशय

मला तिच्या हसण्याचा आशय कळतच नाहीं
स्वीकाराची वार्ता नाहीं
धिक्काराची छटाहि ज्यांतुन उमटत नाहीं
अशा तिच्या हसण्याचा अर्थच उमगत नाहीं

नदीकिनारीं
घायपातिच्या झुडुपाजवळीं
एक लव्हाळा दांतीं धरुनी पुटपुटलों मी
'दो दिवसांची संगतरंगत
अशीच संपुन जाइल
कधीं कसें मग जाऊं आपण
क्षितिजांच्या ओलांडुन सीमा, नक्षत्रांच्या घेण्या भेटी?'
यावर कांहीं उत्तर नाहीं
हसणें, नुसतें हसणें, ज्यांतुन
उद्‌गाराच्या चिह्नांइतका अर्थहि नाहीं
पूर्णविरामांइतुकें तरि जें व्यर्थहि नाहीं

शरदामधलें स्वप्न उषेचें उमलत असतां
अशीच आली भ्रमरण माझ्या दारीं
केसांत तिच्या वळसर बकुळ-फुलांचे
कृष्ण-कमळ करिं लीलेनें धरिलेलें
गळ्यांत एकच सर मोत्यांचा शुभ्र
तीळ कुठेंसा —
ओठ ओलसर जरि न लालसर तितुके
अन् त्यांच्यावर दंव अधुऱ्या हास्याचें
तिला म्हणालों —
वाऱ्यावरची चित्रकला तूं रंगविशील किती दिन ऐशी?

हास्य निरर्थक उधळमाधळत
स्वरांस्वरांनीं विणत मुलायम जाळीं
नाचत फिरशिल किती दिवस तूं पोरी ?
असेंच वदलों कांहींबाहीं...
ती कसली ?
ती हसली, नुसतें हसली !

उंबरठ्यावर तिच्या घराच्या
पद पडलें संध्येचें लगबग
दिशादिशांनीं काजळ घालुन डोळां
एक एक कुणि तिलक लावला भाळा
रातकिड्यांची कुजबुज गजबज झाली
झेपावत कुणि जाय वडाच्या माथां
अंग नदीचें शहारलें थरथरलें
स्तब्ध उभी ती दारीं.
डोळ्यामधलें पाणी कांठोकांठ
झेलुन धरलें कसेबसें पंखांनीं
तळहाताची शिणली नाजुक गिर्दी

तिला म्हणालों–अहो पुरे हा आविर्भाव–
खिन्न तरी ती–
अहो सुहासिनिराणी, सोंग पुरे हें...
खिन्न तरी ती...हंसली अंधुक...कष्टानें हट्टानें
त्या हंसण्याचा अर्थ मला परि कळला नाहीं
आजहि तो कळलेला नाहीं
पुन्हा कधीं कळणारहि नाहीं...

## समजावणी

वेदान्ताच्या उद्‌घोषांत
तुझें काढतों मी चित्र
आणि तुझ्या संगतींत
बोले वेदान्त परत्र

माझ्या एकांतांत सदा
तुझ्यासवें बोलतों मी
आणि तुझी भेट होतां
मौन माझ्या येतें कामीं

तुझ्या वियोगांत मला
दिसतेस दहा दिशीं
आणि भेटींत होतेस
नयनांत मावेनाशी

तुझ्या स्मृतिचिह्नांमधें
माझा गुंतलेला प्राण
तुझ्या सांनिध्यांत होतें
तुझें-माझें विस्मरण

तुझ्या स्वप्नांनीं रंगते
माझी अर्धीमुर्धी नीज
तुझ्या भेटीमधें त्यांचें
कधीं करशील चीज !

तुवां सांगितल्याविना
सारें कळतें कळतें
तुझ्या समजावणीनें
माझें अंतर जळतें...

## तूं तिकडे

तूं तिकडे अन् मी इकडे परि
उशींत झालिस चोळामोळा ;
खार घिट्ठकली होउन आलिस
भिडवित तूं डोळ्याला डोळा.

तूं तिकडे—मग अशी कशाला
न्हाउन आलिस झांजरकालीं ?
तुझाच मोहर दर्वळला का
कडुनिंबाच्या झाडाखालीं ?

सुकवित अपुले केश रेशमी
पानांच्या जाळींतुन आलिस ;
धुक्यांत लपवुन दोन पारवे
वसन लपेटित कुठें निघालिस ?

साळुंकींतुन शीळ घालुनी
खुणावीत तूं मज आलीस ;
मीही दक्षिणवाऱ्यावरतीं
उडलों होउन हलकें पीस.

प्रीत तुझी माझी न कळाली
कुणाकुणाला, या आनंदें
फूलपांखरूं होउन फिरतों
तृणांफुलांतुन मी स्वच्छंदें !

## आज अचानक

नव्हती लिहिली तुजवर कविता
आजहि नसती लिहिली
नव्हतों कधिं लिहिणार, परंतु
आज अचानक –

अंध डोळ्यांनी पहावें तरी काय तुझ्यांत?
न तुझी चाल चंचल
न अवखळ अंचल
न तीळ कुठें गालावर
न कुरळें बंड भालावर
नाहीं गोड खळी
न नाक चाफेकळी
न रंग, न ढंग
न छडीदार अंग
स्वरांत कोयल नाहीं
उरांत ऊर्मी नाहीं
न डोळ्यांत जहर
न अंगांत बहर
लिहीन म्हटलें कांहींबाही
तर तसें कांहींच नाहीं
म्हणूनच
नव्हती लिहिली तुजवर कविता
आजहि नसती लिहिली
नव्हतों कधिं लिहिणार, परंतु
आज अचानक –

रोजरोज पहात होतों
शेजीबाइच्या अंगणामधलीं
प्राजक्ताचीं झाडें
आज माझ्या दारीं त्यांचे सडे जसे पडले आहेत
इंद्राऐसे माझ्या अंगा हजार डोळे फुटले आहेत
दिसतें आहे लपलें धन
कळतें आहे दुखरें मन
आज अगदीं अचानक छंद माझा मुक्त झाला
आणि तुझ्या व्यक्तित्वाचा घोट घेऊन तृप्त झाला !

# सोड तुझें स्फटिकाचें मंदिर

सोड तुझें स्फटिकाचें मंदिर
ये माळावर मैनाराणी
तोड तुझा सोन्याचा पंजर
सोडव तीं अडखळतीं गाणीं

सोड तुझी छळवादी छाया
नग्न नभाचें तुज आमंत्रण
तोड तुझ्या मोत्याच्या बेड्या
फोड फोड तें दुखरें कंकण

उद्यानांतिल हिरव्या दूर्वा
सलतिल ग तुज होउनि कंटक
मध्यान्हांतिल माळ उन्हाचा
तुझ्याचसाठीं पिवळा मंचक

'नको नको' चा कोन सोडुनी
'हवें हवें' ची भोग हवा तर
मुठभर मोठें हळवें स्पंदन
असें दडपशिल त्याला कुठवर ?

उंबरठ्याचा अलंघ्य पर्वत
घे त्याच्यावर एकच झेप
अंबर आहे, आहों तूं मी,
गतजन्मींचा आहे शाप !

# नको हा संथ संकोच

नको हा संथ संकोच ये अशी जवळी गडे
तुझामाझा जिव्हाळा ग पापपुण्यापलीकडे
जन्मोजन्म तुझीमाझी झाली ती वंचना पुरे
प्रत्ययाच्या क्षणीं राणी नको झांकुस रूपडें
शैशवीं सुचलें नाहीं मुग्धत्वीं लाजलाजलों
प्रवाहपतितां ऐसें जीवनीं बुडती घडे !
जगाच्या ऐनबाजारीं चुकामूक घडे जरी
नसतांना मनींध्यानीं गांठ दैवबळें पडे

काळाचें थिजलें नृत्य विश्व ओठंगुनी उभें
आपुल्या मीलनासाठीं तिष्ठती क्षण बापुडे
मिटतां नेत्र सूर्याचे दिशांचीं मिटलीं दलें
तारकांच्या परागांत फिका चंद्रम सांपडे
सांवळ्या झांवळ्याखालीं माड निःस्तब्ध झोपले
तुझ्या निःश्वसनाऐसा वारा स्वहृदयीं अडे
धरती रतिखिन्ना ही शांत शुक्र निजे इथें
संतृप्त जलधी दूर बदलून कुशी पडे

अगा चंद्रमुखी आतां सांगतेस मनुस्मृती !
हाय अस्थिर हा काल कापरापरि गे उडे ! !

# दुःख

दुःखच अपुलें होतें तें होतें इतुकें कीं
करावयाला दुःख न आतां उरलें बाकी !
स्थितप्रज्ञता फासुन उसनी तोंडावरती
सराइतापरि कुठें कसाही हसतों लोकीं

हसतों हसतां हासवितोंही समुदायाला
वीरश्रीचें गीत लागतों कधिं गायाला
अशीं चिल्खतें उभीं करोनी माझ्याभंवतीं
फुलासारखें जपतों या दुखऱ्या हृदयाला

उरांत उरलें नाहीं आतां तसलें स्पंदन
स्फुंदुन स्फुंदुन सरून गेलें तें आक्रन्दन
जळावेंस तूं असेंच होतें माझें जीवन
तुझ्यासवें परि जळून गेलें आहे इंधन

दुःख एवढें — होतिस कां तूं त्या तोलाची
अशी जिंदगी बाद कराया अनमोलाची ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम २१८८३ विः ८२०४
क्रमांक ....१३८१...... नोंः दिः १६।६।६८

## निचिन्त

किती दिसांनीं जमून आला आहे घाट
किती दिसांनीं अशी मिळाली पाउलवाट
स्पर्श वाळल्या गवताचाही मादक आज
टिचभर सुकल्या काशफुलांत हंसे ऋतुराज
भरबाराच्या उन्हांत उसळे आश्विनरात
भान विसरले, उन्मन झाले अपुले हात
क्षितिजावरती तडकुन फुटली मृगजळलाट
किती दिसांनीं जमून आला आहे घाट

झुळुकाभरही वारा नाहीं, नकोच आहे
चुळुकाभरही पाणी नाहीं, नकोच आहे
नसे वासरू, वाटसरू, मग कसे चुकावे ?
कोजागिरिचे प्रेमिक येथें कसे झुकावे ?
उपचारांचें उरावरोनी उठतां ओझ
उमलत आहे रहस्य केवळ तुझें नि माझें
निचिंत अगदीं निचिंत आहे पडली गांठ
अफाट धरती पायीं, वरतीं निळें विराट्...

## जर का पटता शब्द

जर का पटली असती परवल
जर उलगडली असती भाषा
तर माझ्या विव्हळ गीतांना
जन्मायाची नव्हती आशा

जर का जखमच झाली नसती
तर युद्धाचा कैफ कशाचा
कल्पकुसुम जर येतें हातीं
वांझचि ठरता हार उशाचा

जर का पटती खूण खुणेला
उरली नसती गाथा गहिरी
जर का मिळता घोट सुधेचा
हरपुन जाती जादू जहरी

बरवें केलें तुवां भिल्लिणी
भला जाहलों घायळ पुरता
तिरकमठ्याचें टोक विषारी
म्हणून कांहीं उरलें हाता

## सुनीत

घ्यावें मीं तुज मीपणीं मुरवुनी बाहू म्हणूनी दिले
घ्यावें मीं तुज शोषुनी म्हणुन कां हे ओठही लाभले?
घ्यावा ध्यास तुझा म्हणून मन हें निर्माण केलें जसें
हें सारें कळतें तुला म्हणुन तें नाकारसी राजसे

वाटे तूं मुरलीस पूर्ण, परि तूं आहेस दूरावरी
घेतों शोषुन मी तरी उरतसे तृष्णा कशी अंतरीं?
तूं माझ्यांतच विर्घळून इतकी आहेस गे वेगळी
या माझ्या अपुरेपणांत फुलते माझ्या व्यथेची कळी

कां हें वेड रित्या घटास भलतें : प्राशीन मी सागरा
कां ही आस तरी जिवास : उरिं मी ठेवीन सारी धरा
होता एक मुखीं तुषार पडला... तो काय होता कमी?
तूं होतास दिला सुवर्णकण तो ठेवीन राखून मी

घे घे घेशिल तेवढें ... न कधिंही घेण्या तुला बंधन
जं आहेस दिलें ... पुरेल तितुकें अक्षय्य तूझें धन

## शहाणी

वेड मला लागावें इतुकी
तल्लख तिरपी तुझी धिटाई
भाळावर लिहिलेली प्रज्ञा
नेत्रांमधुनी निथळत राही
संथ परंतू तुझी पापणी
स्वप्नांची हरवली निशाणी...

सहासहादा सूर्यावरती
घासघासुनी हिरण्यमात्रा
दहादहादा रेषा घटवुन
जरी घडविलें तुझिया गात्रां
एक थेंब चंद्राचा हुकला
अन् ब्रह्याचा हिशेब चुकला...

चार मितींची तुझ्या भोंवती
कुणी आंखली लक्ष्मणरेषा
मिती पांचवी हवी तुला तर
चल माझ्यासह नवख्या देशा
तिथें पहा जर तुज उलगडला
मंत्र शहाणा वेडामधला...

# डेलिया

डेलियाचें फूल माझें या फुलाचें तेज न्यारें
ताठ आहे मान याची हात या लावूं नका रे

यौवनाच्या रंगरेखा पेटल्या अंगांत याच्या
या इथें घेती तरारी दक्षिणेचे श्रांत वारे

हांसतें हें तुच्छतेनें गंधवेड्या चंपकाला
प्रेमरंगीं रंगलेल्या गुल्बशीला दे इषारे

सूर्यदेवा जाणतें हें, उग्रता प्राशी तयाची
पाहिले नाहींत यानें प्रेमवेडे चंद्रतारे

यास ना अभिसार ठावा यास ना अभिशाप लाभे
हाय, या भाळीं कशाला रेखिलें वरदान सारें

डेलिया गऽ वंचिता तूं, जागती तूझ्या ललाटीं
चन्द्रकांता फेकुनी तूं पूजिसी जळते निखारे...

## संवाद

"ऊठ...
तुझ्या निद्रेच्या विश्वासू सोबतीनें मी आलें आहें.
ऊठ...पापण्या न उघडतां
या पापण्यांचीच मला भिती वाटते रे
त्यांच्या पिंजऱ्यांत मी सांपडलें होतें ना ? तेव्हांपासून
म्हणून म्हणतें
जडावलेले डोळे तसेच मीट
मीट म्हणतें ना......
हं ...असेच

आतां नीट पहा
आहे ना मी तीच...तेव्हांची ?
नकळत तुमचे डोळे वळतात ना माझ्याकडे ?
अजूनहि ती मदिरा आहे रे माझ्यांत
अजून आहे ती जादू.

आठवतें ?
माझ्या कुंतलपाशांत तुझें अंतर गुंतलें होतें...
वादळवाऱ्यासारखा तूं घरीं आलास कीं
मीच ना रुसवा धरायची...गालफुगीचा ?

पहा...
माझ्या तारुण्याची कळी अजून उमलून गेलेली नाहीं
विचार ना तूंच त्या वृद्ध वडाला—
—ज्याच्या पारंब्यांचा हिंडोल करून मी आलें आहें
अजून आपल्याला हसणाऱ्या
झुडुपांमागच्या सदाफुलीला विचार...

## डेलिया

डेलियाचें फूल माझें या फुलाचें तेज न्यारें
ताठ आहे मान याची हात या लावूं नका रे

यौवनाच्या रंगरेखा पेटल्या अंगांत याच्या
या इथें घेती तरारी दक्षिणेचे श्रांत वारे

हांसतें हें तुच्छतेनें गंधवेड्या चंपकाला
प्रेमरंगीं रंगलेल्या गुल्बशीला दे इषारे

सूर्यदेवा जाणतें हें, उग्रता प्राशी तयाची
पाहिले नाहींत यानें प्रेमवेडे चंद्रतारे

यास ना अभिसार ठावा यास ना अभिशाप लाभे
हाय, या भाळीं कशाला रेखिलें वरदान सारें

डेलिया गऽ वंचिता तूं, जागृती तूझ्या ललाटीं
चन्द्रकांता फेकुनी तूं पूजिसी जळते निखारे...

## संवाद

" ऊठ...
तुझ्या निद्रेच्या विश्वासू सोबतीनें मी आलें आहें.
ऊठ...पापण्या न उघडतां
या पापण्यांचीच मला भिती वाटते रे
त्यांच्या पिंजऱ्यांत मी सांपडलें होतें ना ? तेव्हांपासून
म्हणून म्हणतें
जडावलेले डोळे तसेच मीट
मीट म्हणतें ना......
हं ...असेच

आतां नीट पहा
आहे ना मी तीच...तेव्हांची ?
नकळत तुमचे डोळे वळतात ना माझ्याकडे ?
अजूनहि ती मदिरा आहे रे माझ्यांत
अजून आहे ती जादू.

आठवतें ?
माझ्या कुंतलपाशांत तुझें अंतर गुंतलें होतें...
वादळवाऱ्यासारखा तूं घरीं आलास कीं
मीच ना रुसवा धरायची...गालफुगीचा ?

पहा...
माझ्या तारुण्याची कळी अजून उमलून गेलेली नाहीं
विचार ना तूंच त्या वृद्ध वडाला—
—ज्याच्या पारंब्यांचा हिंडोल करून मी आलें आहें
अजून आपल्याला हसणाऱ्या
झुडुपांमागच्या सदाफुलीला विचार...

आणि खरें सांगूं का ?
मला लवकर जायचें नाहीं,
मी माझें इवलें घड्याळ विसरून आलें आहें...
पण तूं थांबणार आहेस का ?
हिरव्या राईतल्या लाल नागमोडींत तूं धांवायचास—
पण माझा हात धरून ...
आतां तूं सारखा पुढेंच जातो आहेस...

माझ्या बिलवरांच्या कंगोऱ्यावर अडखळूं नकोस
पुढें जा... ..
पण खरें सांगूं...
माझ्या दुःखाचा दिवा
आपल्या तोंडावर धरून तूं फिरतोस
म्हणून तुला लोक बघतात...
तुझ्या अवतींभंवतीं कोणी तुझें नांव कुजबुजतात
तुझी मान वर करण्यासाठीं...
पण त्यासाटीं माझी मान तूं खालीं केली आहेस...

काल पाहिलें मीं तुझें वलय
ऐकल्या त्या टाळ्या...
तुझ्या गर्वगीताच्या तालांत मी बुडलें खोल...खोल
तुला भेटणार होतें...
पण तिथें हजार डोळे होते रे पहाऱ्याला
म्हणून म्हणतें...इथेंच...
डोळे मिटून मला पहा...पहा ना... ”

" स्वप्नशीले, शांत हो...
माझें पाप...तुझा शाप
ह्या समंधांची कावड माझ्या खांद्यांवर आहे...
खरेंच का मी तुझ्या दानाचा हिशेब केला ?
तसेंहि असेल...
माझ्या कांगाव्याच्या कोलाहलांत
तुझा आवाज मी बुडवला असेल...
एकान्तांत त्याच आवाजाचें तप्त शिसें
माझ्या कानांत पडतें हेंच मला वरदान आहे—

तुझ्या पहिल्या ऋणाचें वजन
छातीला पेलवत नसतांना वर बाण सोडूं नकोस.
तुझ्या केसांत तोंड लपविण्यांतलें सुख मीं भोगलें...
पण मला दिशाहि पाह्यच्या होत्या.
तुझीं जादूचीं बोटें माझ्या पापण्यांवर तशींच राहतीं...
—तर मला अशांतीचें वरदान मिळालें नसतें...
मीं दिशा पाहिल्या आहेत,
त्यांचें क्रंदन माझ्या आत्म्यांत मिसळलें आहे...

धुळींतल्या जगाचें खारें जीवन...
न्यायाचे खून, मोकळ्या श्वासासाठीं धडपड...
अमृताचा घोट नाकारून गेलों नसतों
तर विषाची चव मला कळली असती का ?

चंद्राचा चेहरा सारेच पाहतात
मीं चंद्र उलटून पाहिला

म्हणून तर ज्वालामुखीची यात्रा झाली......
आतां तूं येत जा...अशीच
माझ्या जादूच्या सतरंज्या तुझ्यासाठींच पसरल्या आहेत..."

" माझ्या राजसा
तेवढें पुरत नाहीं रे...
तुझ्या जादूच्या सतरंजीवरचा हा प्रवास पुरत नाहीं...
निळ्याजांभळ्या परस्पर छेदणाऱ्या वर्तुळांतून
मी पाकोळीसारखी कशी भिरभिरत राहूं ?

तूंच म्हणालास ना...
अनभुक्त उर्वेची हांक जबरदस्त असते म्हणून...?
कण्याच्या कणांत झिणझिण्या आणणारी
स्पर्शवीणा तूं छेड...
गरम रक्तालाहि कांहीं अर्थ आहे...

तुझा अनुताप मी दुरून प्यालें आहें...
पण अनुतापाच्या अनुपानानें जखम भरत नाहीं...
तुझी भूक वेगळी, खरी...
पण मी काय करूं...?
पहा, पहा जरा माझ्याकडे
तुझ्या अजाण सहचरीच्या मिठींतून जरा वळून
पहा ना एकदां—

अजून मी
शरदांतल्या तरण्याताठ्या पहाटेसारखी आरस्पानी आहें.

अरे माझ्या फुलचुखी पांखरा
नाजुक दंश भरून येत नाहींत...
मी काय करूं ?
मी झांजरकालीं नाहून येतें
सोनेरी वसन लपेटून घेतें
पण मी काय करूं...
पहा ना एकदां
असें नाहीं...
तसें...
तिकडे पाहिलें होतेंस तसें...

पहा—पहा—पहा—
आवर्ताला आवर घालायला तूंच शिकव...
तें तुला साधलें आहे...
पण खरें सांगूं का ?
सारें दुःख माझें होतें...
तूं तें दत्तक घेतलेंस
आणि केलेंस त्याला उलटें—
उत्तान...
सुखाची साय तुझ्यावर आली आहे
मी नुसती कढतें आहे
फुंकर हवी आहे ती माझ्यावर...

जरा आरशांत पहातोस का ?
माझी पाठ बिलोरी आहे ना ?
मिटल्या डोळ्यांच्या आंत आहे ना एक विचित्र आरसा ?

पहा तूं तुला
बळकट बाहू...रुंद खांदे...
मी विसरलें नाहीं रे...
तूं सगळें सगळें कसें घेतलेंस ?
सुख घ्यायचें होतेंस—पण दुःख कां घेतलेंस ?
दुःखावर तुझा काय अधिकार होता ?

एका अवमानितेच्या दुःखावर
तूं व्यापार मांडलास
त्या टाळयांतून, तुझ्या वलयांतून
माझें दुःख सोडवून
माझें मला देऊन टाक.
मीं ठोकळ्यांचें घरसुद्धां रचलें नाहीं
माझ्या दुःखाचाच मला आडोसा होता.... ”

“ शांत हो स्वप्नमयी...
तुझ्या डोळ्यांना प्रखर रक्ताची लाली शोभत नाहीं.
निळ्या-जांभळ्या वर्तुळांतल्या तुझ्या चीत्कारांची वेदना
मला कळत का नाहीं ?

तुझ्या आणि माझ्या क्षितिजांना छेद गेला नाहीं
पण तूं अशी हट्टी—
तुझी छाया मी सोडली तरी
तुझें अस्तित्व माझें कवच झालें आहे...

खरें सांगू का ?
व्यथेच्या गंगोत्रीवर कोणाचाच हक्क नाहीं.
खरें सांगू का...
दुःख त्याच्या मातृत्वानें सुखी झालें आहे.
तुला आणि मला पाताळांत दडपून
तें त्रिविक्रम झालें आहे.
वांझ व्यथेवर ताम्रपट असूं शकतो
पण व्यथेचा विश्वाकार सर्वांचा आहे...
म्हणूनच
आपल्या छायांनीं परस्परांना शापलें
तरी आपला प्रकाश एक झाला आहे. ”

## सरली झिम्मड

सरली झिम्मड उरलें केवळ
पागोळ्यांचें टिपटिप गाणें
आणि माझिया मनांत अंधुक
वतुळ उठलें केविलवाणें

मत्त मनाच्या संपुन केका
उरला नवखा अस्फुट खर्ज
तरला वैराणांत काजवा
सरला लाख विजांचा तर्ज

ओसरली अंवसेची भरती
रितेपणाची उरली रेती
विरली प्रीती उरलीं नातीं
उरली बेगड रंगसफेती

फिरली राजापुरची गंगा
उरलें कुंडामधलें पाणी
खिरला मेरू, उरला गेरू
पाडुन पाडुन चलनी नाणीं

## रानपांखरा

रानपांखरा,
हिरव्या कवळ्या झुबक्यावरतीं
तुरे फुलवसी नकळत तुझिया स्वरलहरींचे

रंग जयांचे
निर्व्याजपणें हसरे गहिरे
वैराणांतिल तृणपुष्पापरि सोज्वळ पिवळे
भग्न तटाला मिठी घालत्या गोकर्णीपरि निळे जांभळे
शिणल्या तुझिया कंठाऐसे तांबुस तांबुस

गंध जयांचे
अर्धोन्मीलित भावुक उत्सुक
रातराणिच्या निःश्वासांनीं रान भिजावें
मुग्ध गुलाब जवानिंत यावे
मंदपणें निशिगंध हसावे
जाइजुईनीं परस्परांना गुज सांगावें
गंध तसे ते—

बंध असे तर तुझ्या सुरांचे—
त्या गोफांतच बद्ध होउनी स्वस्थ पडावें.
वेढुन घेउन तुझ्या सुरांचे रेशिमधागे
मग्न रहावें त्या कोशांतच
भविष्यांत फुलपखी होउन सर उडाया

रानपांखरा,
नकोस ऐकूं गीत तुझ्या संगीतावरलें

पडेल यांतिल शब्द तुझ्या जर कानावरतीं
थिजेल गाणें बापुडवाणें कंठांत तुझ्या
होतों मीही असाच फुलवित
हिरव्या कवळ्या झुबक्यावरतीं
माझ्या गीतफुलांचे झेले
चुकुन झेलला शब्द परी मी माझ्या स्तुतिचा
अन् विरघळलें गाणें, उरलें कवित्व हातीं
बंदी झालें फिरुन पांखरूं अंड्यामाजीं !
वाट पाहतों फिरुन कधीं हें कवच उलेल
नकळत मजला फिरुन फुलेल
माझ्या गीतफुलांचा झेला.

निळ्या अनंताचा कधीं
झाला होता सहवास
सात कपाटांच्या आंत
सय त्याचीही जीवास

झालें पशूंच्या रक्ताचें
कधीं उरांत स्पंदन
अजूनहि धुगधुगे
धमनींतलें इंधन

सर्पजन्मीं होतों त्याचें
आहे अंधुक स्मरण
तीव्र वलयमीलन
अवमानित मरण

फुलपांखरूं होतांना
जीव झाला होता गोळा
जेव्हां आपुलें मरण
अहो, पाहिलें म्यां डोळा

कधीं होतों आई, आणि
कधीं बापहि बेपर्वा
साता संपुटांत आहे
जागा अजूनहि सर्वां

लक्ष चौऱ्यांशींचा फेरा
आलों पुरता करून
आणि काचेचें हें पात्र
गेलें मद्यानें भरून

आता ब्रह्मरंध्रापाशीं
लयविलयांचे नाद
अनाहत तारांतून
झणाणत उठे छंद...

# होडी

औट हात होडीला माझ्या
आभाळाहुन मोठें शीड
बंदर-धक्के चुकवुन बेटी
भलत्या जागा घे निर्भीड

होडी माझी चलाख अचपळ
वादळ येतां ती फुरफुरते
उंच उंच लाटांच्या वरती
झोके घेत घेत गरगरते

कधीं कधीं मग थकली जर का
युगें युगें ती टाकिल नांगर
आभाळाच्या शिडास, अपुल्या
दीड वितीचा घालिल पंजर

जागेवर परि खिळल्या खिळल्या
मनांत मोजिल तळचे मोती
नाकावरती दिवा लावुनी
झोत पारवा टाकिल भवतीं

क्षणांत उठते कधीं दचकुनी
शीड सोडते भरकन वरती
नांगर तोडुन भिन्नाट पळे
क्षितिजांच्या ओलांडुन भिंती

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८४०३

भूत-समंधांच्या बेटांशीं
सात जांभळे-पिवळे सागर
शिशासारख्या जड पाण्याच्या
तळांत सर्पमण्यांचें आगर

एक मिळावा चुकून तिजला...
मिरवित जाइल असा मग मणी
सुळकांडी घेईल उंच अन्
दिसेल तुम्हां नवी चांदणी...

औट हात होडी जरि माझी
बुडेल, आणिक बुडणारच ती
तिच्या शिडाची माया ओढिल
सात पिढ्यांना पुढती पुढती

## सांखळी

जेथें जातों तेथें येते सांखळी सांगाती
क्षितिजाच्या परीघांत चालली भ्रमन्ती

किशोरींनीं धरिलासे पंचमीचा फेर
हांसण्याची फैर आणि गाण्याची लकेर
नाचावेसें वाटे मला त्यांच्यासवें सैर
तोंच मला भय दावी भावी किंवदन्ती
जेथें जातों तेथें येते सांखळी सांगाती

ओल्या उन्हावर आल्या श्रावणाच्या सरी
चमेलीच्या मांडवांत मोत्यांच्या झालरी
भिजावेसें वाटे मला रानफुलांपरी
परी परीटघडीची पडेना विस्मृती
जेथें जातो तेथें येते सांखळी सांगाती

कधीं वाटे हात तुझे हातांत धरावे
चंदनाच्या चांदण्यांत दोघांनीं फिरावें
समुद्राच्या कुशीमधें हळूच शिरावें
तोंच माझ्या प्रतिष्ठेची कळ उठे चित्तीं
जेथें जातों तेथें येते सांखळी सांगाती

फूलपांखरांच्या मागें धांवणें जमेना
पाणलोटामधें होडी लोटतां येईना
वेडावीत फिरूं कसा रानपांखरांना
तिशी घाली बेडी माझ्या चरणांभंवती
जेथें जातों तेथें येते सांखळी सांगाती

## शिणलेलें आभाळ

शिणलेलें आभाळ टेकलें
डोंगरमाथ्यावरतीं आज
करवंदीला आजच फुटली
तांबुस करडी इवली लाज

फूल उन्हाचें मलूल झालें
आज दिशांचीं चिमणीं तोंडें
तिरकमठ्याची चाहुल लागुन
झाडांचे बाचुकले शेंडे

उंच धुळीचें गिर्मिट गेलें
भेदुन कबऱ्या पोलादाला
आज अखेरिल भोंवळ आली
सागाच्या सुकल्या पानाला

दूर कुठें क्षितिजाच्या मागें
न्हात असतां पश्चिम हंसली
अध्यां घरट्यामधें दचकुनी
चिमणाचिमणी थिजून बसलीं

भणभण वारा वेडा झाला
मोजुं लागला दिवसां तारे
तोंच विठूच्या कोठाराचीं
उघडीं झालीं अवघीं दारें !

... ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २१८८३ वि: ०५१०२५
क्रमांक ...१३५८१..... नों: दि: २६।६।६६

## नदी

अश्मयुगाचें कश्मल फेडुन
स्थळकाळाचे कातळ फोडुन
एक निघाली मन्वोत्रीहुन
पंचरसी लाव्हाची विव्हळ चंचल चलती धारा

हिम विरघळतां ही विरघळली
ध्रुवावरून झेंपावत सुटली
आवेगानें त्रिभंग फुटली
वेंटाळत ही उभवी निरवी लाखों घरसंसारां

पात्र हिचें जरि होतें दुबळें
पुरुषोत्तमवीर्यें खळखळलें
शून्याच्या शेजेवर फळलें
अश्वत्थाचा हिनेंच उलटा केला सर्व पसारा

हिच्या प्रवाहीं भयद भोंवरे
हिच्या तटावर वादळवारे
हिच्या जळांतुन गूढ इषारे
इथें हलाहल, इथेंच मदिरा, इथें सुधेच्या धारा

हिच्या तरंगीं इंद्रधनूधन
सदैव पूजन, सदैव कूजन
पाझरतो मध कमलदलांतुन
वंशवनीं उन्मादक गाणीं गाई चन्दनवारा

इथें लाभती स्वस्तिवायनें
इथें चालती सामगायनें
इथेंच श्रद्धा इथें बहाणे
मंदिर मस्जिद पडती उठति क्रूसहि घेइ निवारा

हिनें व्यापिल्या दिशा दहाही
पूर हिला ये ऋतूंत साही
क्षितिज काय तें माहित नाहीं
हिनें कवळिले सूर्यचन्द्र अन् हिनेंच खुडल्या तारा

आली रे ही महाभयंकर
झाली रे झाली प्रलयंकर
या रे कुणि होउन शिवशंकर
माथ्यावरतीं झेलुन इजला द्या मंगल आकारा

ना तरि ही फोफावत जाइल
स्वतां स्वतांला पिंजुन घेइल
पृथ्वीतें पाताळीं नेइल
या रे या झणिं कुणी भगीरथ . . दावा संथ किनारा . . .

## बाभुळझाड

अस्सल लाकूड, भक्कम गांठ
ताठर कणा टणक पाठ
वारा खात गारा खात बाभुळझाड उभेंच आहे

देहा फुटले बारा फांटे
अंगावरचे पिकले कांटे
आभाळांत खुपसून बोटें बाभुळझाड उभेंच आहे

अंगावरची लवलव मिटली
माथ्यावरची हळद विटली
छाताडाची ढलपी फुटली बाभुळझाड उभेंच आहे

जगलें आहे, जगतें आहे
काकुळतीनें बघतें आहे
खांद्यावरतीं सुताराचें घरटें घेऊन उभेंच आहे

टक्....टक्....टक्....टक्
चिटर् फटक्....चिटर् फटक्
सुतारपक्षी म्हाताऱ्याला सोलत आहे, शोषत आहे

आठवतें तें भलतें आहे
उरांत माझ्या सलतें आहे
आंत कांहीं कळतें आहे, आंत फार जळतें आहे

अस्सल लाकूड भक्कम गांठ
ताठर कणा टणक पाठ
वारा खात गारा खात बाभुळझाड उभेंच आहे

## आज कळे

आज कळे मला बळें टिळे त्यांनीं लाविले
बळानेंच गळां माळ घालुनीयां गोंविले

चुकून मी भाविकांच्या कळपांत पडलों
नागव्याचा भगवा मी अळेंबळें घडलों

राउळांत जातां जातां डोळा होता घातला
राखेनें मी गोरा झालों काळा मी मुळांतला

भजनाच्या सुरामधें लपविली लावणी
कन्हैय्याच्या सांवलींत पालवीत गौळणी

रामनाम वरी, उरीं झपाटतां मदनें
आरतींत पुरंध्रींचीं बघावींत वदनें

हटानेंच समाधीचें सोंग मात्र घ्यावें मीं
धूपधूसर सांजेंत कळंजून जावें मीं

जाग्रतीची ऐट वरी घेतां मोहननिद्रा
देवा घालवाल केव्हां माझी वैष्णवमुद्रा

## वैशाख : १

विषण्ण झाल्या निळ्या सावल्या
हिरमुसली छायांची नक्षी
हुंकारांची छिन्नी मारित
टवके काढी कबरा पक्षी

ग्रीष्माच्या गहिंवरल्या हृदयीं
सूक्ष्म सुयांचीं अग्रें खुपलीं
निळाइच्या भरल्या नयनांतुन
करुणा थरथरली टपटपली

कळवावें तें कळवुन गेली
ही थेंबांची दुबळी भाषा
गंधवतीच्या निःश्वासांतुन
प्रकट जाहली मीलन-आशा

## वैशाख : २

कडू करंजा-कडुनिंबांवर
राहुन गेला चैत्रपाडवा
भिडला तो कायमचा भिडला
तिथें चावरा गरम गोडवा

रानदांडेंग झाड वडाचें
मिटुनि बसे स्वप्नाळू नेत्र
गुल्मोहर ऐटींत उघडतो
लाल तुऱ्यांचें चिनई छत्र

कातळकाळ्या माळालाही
वाटत असतें आंतुन हळवें
वैशाखाचें ऊनहि होतें
वळिवसरीनें हिरवें हिरवें

वळवासाठीं उत्सुक झालें
माझें वैशाखाचें अंतर
तरीच माझ्या क्षितिजावरतीं
इंद्रधनूचा फुटतो अंकुर...

## एक डोळा आणि एक डोळा

एक डोळा काळा सोव्ळा, रूखासूखा, वखवखलेला
निळ्या काळ्या, नव्या कोऱ्या ब्यूकमागें धावत आहे;
तिकतिकणाऱ्या सडकेवरून
टेकाडावर सरपटत,
सुसाटत, पिसाटत
लाल पिवळ्या, जून कवळ्या
बागेवरतीं तुटून पडून
फिकट हिरव्या बंगलीवरतीं
घोंगावत फिरतो आहे;

मलमलीचें पोट चिरून,
मखमलीवर पाय ठेवून
चोरून आंत शिरतो आहे;
सोनपितळी कुंडीमध्यें
फताडपंख्या पामखालीं तणावून निजतो आहे;

किणकिणणारीं कांचपात्रें
लचकणारीं चारुगात्रें
यांच्या मधांत भिजतो आहे;
कोचाखालीं गालिचावर
कुलंग्याचें रूप घेऊन
तुष्ट तोंड, सुस्त देह, पुष्ट मांडी बघतो आहे;

जव्हेऱ्यांच्या बाजारांत
गिरक्या घेत उडतो आहे;
विमानांत चढतो आहे
गॉगलवाला एक डोळा ......

एक डोळा साधा भोळा, नंगा पिंगा, बिथरलेला
भराभर भरून येतो,
झराझर झरून जातो ;
घामेजलेल्या कोमेजलेल्या
ठार मेल्या फुलांवरती धार त्याची झिरपत आहे
त्यांच्या संगें करपत आहे

नको तेथें शिरतो आहे
भलतेसलतें बघतो आहे,
खष्पड कुठलें खोपट बघून कौलारांत घुसतो आहे ;
खडखडणाऱ्या पातेल्यांतील कळकट पळींत बसतो आहे ;

चौकस तिरकस वेध घेऊन
मातटलेल्या लक्तरांचा सुईदोरा बनतो आहे
गटारांत खेटर होऊन भिजतो आहे ;
कोळपलेल्या निर्माल्यांत निजतो आहे ;
वडाराच्या मडक्यामध्यें शिजतो आहे ;
फाटून गेल्या पदरामागील
आटून गेल्या मायेवरतीं मऊ शाल होतो आहे ;
वाळून गेल्या
कोळून गेल्या
इवल्या अर्ध्या पोरांओठीं दूध पिळत गळतो आहे ;
जळतो आहे ... जळतो आहे
लाल ... पिंगा ... ओला चिंब ...
नंगा नंगा ... बिथरलेला ...
हपापलेला एक डोळा दिपतो आहे
चपापलेला एक डोळा टिपतो आहे ...

## मुखवटा

असा मुखवटा...तसा मुखवटा...
कुठला उलटा कुठला सुलटा ?...

अंगाराचे डोळे तिरळे
विदूषकाचें नाकहि कुरळें
नरसिंहाचा उघडा जबडा
अधरांवरतीं दंतुर कठडा
जास्वंदीची बहीण जिव्हा
तिच्यांतुनी ओसंडे लाव्हा
शूर्पणखेचे कान तिकोनी
शिंग उगवलें भुवयांमधुनी

—आंत हरपलें
रेशिमजावळ भुरभुरणारें
टपोर लोचन भिरभिरणारे
इथच लपली
चिमुटभराची जिवणी इवली
गोड खळीची गाल गुरोळी
इथेंच लपलें भान वयाचें
इथेंच लपलें अभय भयाचें
कधीं अकारण खुसखुसणारें
कधीं अचानक मुसमुसणारें
—असा मुखवटा
कुठला उलटा कुठला सुलटा ?

*   *

आठ अंगुळें भाळावरतीं
खुले केशरी गंध दुबोटी

भुंवयांच्या झुडुपांच्या खालीं
त्रिलोचनाला लज्जा आली
कपाळांतुनी नासा सुटली
उग्र मिशांना थेट भेटली
खांदे कसले – कातळ कांतिव
छाती कसली – लोहच ओतिव

—आंत वाहते
कारुण्याची झुळुझुळु धारा
आंत सदा आर्तांस निवारा
आंत घडतसे वाट कृपेची
भरते स्नेहें गुहा मनाची
वात्सल्याचें भरलें मोहळ
जिथें मधाला आली भोंवळ
असा मुखवटा—
कुठला उलटा कुठला सुलटा ?

* *

तन्वी श्यामा शिखरिदशना
पक्वबिम्बाधरोष्ठी
मध्ये क्षामा चकितहरिणी—
प्रेक्षणा निम्ननाभिः ...
सचीव कुठली ? कुठली रंभा ?
कुठली ललना ? कुठली अंबा ?
कुठली सीता ? कुठली कुलटा ?
कुठें कमल अन् कुठें मुखवटा ?

चंदनचर्चितनीलकलेवर–
पीतवसनवनमाली
केलिचलन्मणिकुण्डलमण्डित–
गण्डयुगस्मितशाली

—हे गोपीमानसहंसा रे !
—हे नंदनंदना कंसारे !

—परब्रह्म निष्काम निरंजन !
भीष्मावरि धरिलेंस सुदर्शन

अनेकबाहूदरवक्त्रनेत्रा
सहस्रशीर्षा पुरुषा विचित्रा
सत्यदेव तूं–
अन् तूं ठकडा !
कुठें मुखवटा ? कोठें मुखडा ?

*          *

कौटिल्याचा कुठला बुरखा ?
अलमगिराला जवळुन निरखा
जवळुन देखा संतमहंतां
पहा उकलुनी करुणावंतां

सावध सावध सावध व्हा रे
भुताटकीचें भरलें वारें...

फुलेंहि लाविति उसना रंग ?
चंद्रहि आणी शीतल सोंग ?
आभाळाचा पडदा उलटा
विश्व व्यापुनि
दशांगुलें तरि
उरे मुखवटा, उरे मुखवटा

## गरुड

औरस चौरस
पिंजऱ्याच्या आडोशांत
मोजलेल्या आकाशांत
गुदमरत होतें
गरुडाचें पोर
जरत्कारू
दग्धपक्ष
गलितगात्र
नरमगरम निःश्वासांचें

पुष्कळ पुष्कळ वाटत होतें
औट वितीच्या विमानामधून
पहावें अपार्थिव
सहावें अघटित
अधीर क्षणांत
करावी अधुरीच कुरवंडी

वाटत होतें
बांधूंच नयें घरटें कधीं
—किंवा बांधावें
हिरण्मय सूत्रांनीं
हिमाच्या साम्राज्यांत
आपणच मोडाव्या
आपल्याच घरट्याच्या
चिंचोळ्या चिंधोट्या

आणि घेऊन
उन्मनी उन्मादांत
धीरोदात्त धडक
द्यावें आपणच आपल्याला सुळीं

उगवत्या वीणेच्या
सोनेरी तारांवर
गरुडांच्या पंखांचेच होतात ना आघात ?
पाय बांधले तरी
नसांतील रसाला
फसफसून फुटणारी थांबते कां उकळी ?
विशाल पंखांच्या
एकाच झडपेमधें
काळाचा कालिया दडपला जातो ना ?
तरीही तरीही
अनभुक्त उर्वेची
जबरदस्त हांक येते तरी कशी ?

आलें आलें आलें
नेहमीच्या निर्धारानें
आदमच्या बागेंतील
सफरचंदी सुख
भिनला भिनला भिनला
नेहमीच्या तीव्रतेनें
तक्षकाच्या दंशामधील
वेदनेचा वेदांत

निळ्या गगनाच्या
गवसणी मधेंच कां
फुटावेत झंकार
कणांच्या वीणांना ?
सूर्याच्या वीर्यानें
फळणाऱ्या ऋतूंना
करावी सोबत
हा आत्म्याचा शाप...

कुठून कुठून कुठून
उमटतात उमाळे
वक्षाला चिरणारे
पक्षिणींचे चीत्कार

डौलदार गिरकीच्या
बिलबिलीत वर्तुळांतून
कशी रे लपते या पंखांची कानस ?

तिरप्या मानेच्या
मोहरल्या महिरपींत
गुंततात गळे गरुडांच्या गतीचे !

तिर्यक् पुच्छाच्या
एकाच फटकाऱ्यांत
कोसळतें वजन या पंखांच्या पारड्यांवर

तरीही एखाद्या
सफळ सकाळीं
सुखावल्या मानेचीं
विस्कटतात पिसें
उमटते गळ्यावर
नव्याची निशाणी
येतात येतात
परांच्या बुरुजांना
सुरुंग लावीतच
सहस्र वीणांचे
झणाणत झंकार
पंच महाभूतांच्या
पिंजऱ्याच्या बाहेरून
सहाव्या भूताचा
उमटतो हुंकार

# विनोबा

स्थिरमेरूचे पूत विनोबा
नवपवनाचे दूत तुम्ही
संसाराचें सार झोकुनी
अनासक्त अवधूत तुम्ही
मातीहुन तुम्हि माती असुनी
हिमालयाहुन भव्य तुम्ही
तुम्हि गवताचें पातें असुनी
गगनदिव्यांहुन दिव्य तुम्ही

पाताळापर्यंत अंत तुम्हि
बघतां होउनियां पाणी
अर्थ मागुती धावत यावा
अशी मुखांतुन ये वाणी
तुम्हीच जळतां तुम्ही जाळतां
तुम्हीच अग्नी, हव्य तुम्ही
मातीहुन तुम्हि माती असुनी
हिमालयाहुन भव्य तुम्ही

क्रंदनांतलें इंधन तुम्हां
दहा दिशांतुन दिसताहे
मउ लोण्याहुन तुम्ही असुनिही
वज्र तुम्हां न शिवूं साहे
क्षितिजान्ताचे यात्रिक असुनी
क्षितीस गणतां सेव्य तुम्ही
मातीहुन तुम्हि माती असुनी
हिमालयाहुन भव्य तुम्ही

तुम्हि पृथ्वीचे लाल बाल परि
स्वर्गाशीं तुमचें नातें
तुम्हि सर्वांहुन न्यारे असुनी
सर्वांशीं तुमचें जमतें
दासांचे अनुदास तुम्ही अन्
राजांचे उपजीव्य तुम्ही
मातीहुन तुम्हि माती असुनी
हिमालयाहुन भव्य तुम्ही

सूर्यवीर्य शशिशांति भ्रांती
वाऱ्याची भिनली अंगीं
समिधेपरि वरि शुष्क असुनिही
अंतरंग नित रसरंगीं
नित्य नव्या यज्ञाचे दीक्षित
विस्मरलां अपसव्य तुम्ही
मातीहुन तुम्हि माती असुनी
हिमालयाहुन भव्य तुम्ही

## केवळ माझा सह्यकडा

भव्य हिमालय तुमचाअमुचा, केवळ माझा सह्यकडा
गौरीशंकर उभ्या जगाचा, मनांत पूजिन रायगडा
तुमच्याअमुच्या गंगायमुना, केवळ माझी भिंवरथडी
प्यार मला हे कभिन्न कातळ, प्यार मला छाती निधडी
मधुगुंजन लखलाभ तुम्हांला, बोल रांगडा प्यार मला
खिस्त बुद्ध विश्वाचे शास्ते तुकयाचा आधार मला
धिक् तुमचे स्वर्गहि साती
इथली चुंबिन मी माती
या मातीचे कण लोहाचे, तृणपात्यांना खड्गकळा
कृष्णेच्या पाण्यांतुन अजुनी वाहतसे लाव्हा सगळा

कबीर माझा, तुळसी माझा, ज्ञानेश्वर परि माझाच
जयदेवाचा जय बोला परि माझा नाम्याचा नाच
जनीं जनार्दन बघणारा तो 'एका' हृदयीं एकवटे
जनाबाइच्या ओवीमध्यें माझी मजला खूण पटे
इंद्रायणिच्या डोहामधली गाथा ओली ती ओली
ती माझी मी तिचाच ऐशी जवळिक कायमची झाली
भक्तीचा मेळा दाटे
चोख्याची पैरण फाटे
निर्गुण मानवतेची पूजा करणारे करुं देत भले
माझ्यासाठीं भीमाकांठीं भावभक्तिची पेठ खुले...

रामायण तर तुमचेंमाझें भारत भारतवर्षाचें
छत्रपतीची वीरकहाणी निधान माझ्या हर्षाचें
रजपूतांची विक्रमगाथा तुमच्यापरि मजला रुचते
हृदयाच्या हृदयांत परंतू बाजी बाजीची सुचते
अभिमन्यूचा अवतारच तो होता माझा जनकोजी

दत्ताजीचा शेवटचा तो शब्द अजुन हृदयामाजीं
बच जायें तो और लढें
पाउल राहिल सदा पुढें
तुम्हांस तुमचे रुसवेफुगवे घ्या सगळा नाजुक नखरा
माझ्यासाठीं राहिल गांठीं मरहट्टयाचा हट्ट खरा

तुमचेमाझे ख्यालतराणे दोघेही ऐकूं गझला
होनाजीची सोनलावणी वेड लावते परि मजला
मृदंग मोठा सुमधुर बोले, मंजुळ वीणा अन् मुरली
थाप डफाची कडकडतां परि बाही माझी फुरफुरली
कडाडणारा बोल खडा जो दरीदरीमधुनी घुमला
उघडुनि माझ्या हृदयकवाडां तोच पवाडा दुमदुमला
तटातटा तुटती बंद
भिंवईवर चढते धुंद
औट हात देहांत अचानक वादळ घुसमटुनी जातें
उचंबळे हृदयांत पुन्हां तें इतिहासाशीं दृढ नातें

कळे मला काळाचें पाउल द्रुतवेगानें पुढतिं पडे
कळे मला क्षितिजाचें वर्तुळ क्षणोक्षणीं अधिकचि उघडे
दहा दिशांचे तट कोसळले, ध्रुव दोन्ही आले जवळी
मीही माझे बाहू पसरुन अवघ्या विश्वातें कवळी
माझ्या घरचीं विशाल दारें, खुशाल हीं राहोत खुलीं
मज गरिबाची कांबळ वाकळ सकळांसाठीं आंथरली
मात्र भाबड्या हृदयांत
तेवत आहे जी ज्योत
ती विझवाया पहाल कोणी मुक्त करुन झंझावात
कोटि कोटि छात्यांचा येथें कोट उभारूं निमिषांत

# अर्धम्

अर्धा विडा द्यावा घ्यावा
त्याची रंगतच न्यारी
एक लवंग वेचव
अर्धी ठसक्याची भारी !

कॉफी निम्मी निम्मी बरी !
कप मला बशी तुला
अर्धा घोट झाल्यावर
देई बशी घेई पेला ! !

एक खट्टीमीठी गोळी
घेऊं वांटून दोघांत
अर्धी तुला अर्धी मला
वर चिमणीचे दांत !

हवे कोणा दोन्ही गाल ?
बरा ( एका वेळीं ) एक !
दोन ओठांपैकीं देई
फक्त अधर अर्धुक

नको अनावृत मस्त
नको आवृत बंदिस्त
गडे ! अर्ध आवृतांत
आहे सौंदर्य समस्त !

संसाराच्या गणिताचें
नको अचूक उत्तर
बरा फुलांचा निःश्वास
नको कुपीचें अत्तर !

## गोरी

गोरे गोरे गाल तुझे
गोरेमोरे झाले
गोरा गोरा चंद्र तुझ्या
भाळावरी खेळे

गोरा गोरा कंठ तुझा
गोरागोरा खांदा
अंधालाही दीठ फुटे
असा गोरा बांधा

गोऱ्या गोऱ्या पाठीवरी
कंचुकीच्या गांठी
गोऱ्या पोटावरी रुते
चोळी जरीकांठी

गोऱ्या गोऱ्या केळीचा ग
गोरा गोरा गाभा
गोऱ्या गोऱ्या पावलांची
लाजलाल आभा

गोऱ्याभुऱ्या चांदण्यांत
गोरी तुझी काया
माझ्या काळ्या मनीं पडे
तिची गोरी छाया !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थ
अनुक्रम 29CC3 वि: ...
क्रमांक ...93491..... नों: दि: ...

## वय वर्षें सोळा

वय वर्षें सोळा ग
आवर तर घोळा ग
भिरकावुन जाउं नको
भिरभिरता डोळा ग

उधळत जातेस उगी
नवतीची नवलसुगी
अंगाशीं येइल ग
थट्टेची गालफुगी

तूं अल्लड पल्लविता
मी कर्मठ शठ पुरता
विन्मुख मी होउं कसा
सन्मुख तूं बोलवितां

या असल्या फंदीं ग
होशिल शरमिंदी ग
ऐक जरा ऐक ऐक
एकच तुज संधी ग

वय वर्षें सोळा ग
हलता हिंदोळा ग
आवर तर भिरभिरता
शकुनाचा डोळा ग

## रंगानें तूं गव्हाळ

रंगानें तूं गव्हाळ त्यांतून अंगावरतीं सोनसळा
टवटवीत घवघवीत मुखडा चांफ्याचा जणुं सोनकळा

कुरळ्या कळपामधून चुकला भाळावर कुणि वाट खुळा
मधाळ ओठीं सुढाळ मोतीं मधेंच करती झळाझळा

कानशिलाचें पान कोवळें सान त्यावरी तीळ निळा
तिरप्या नजरेमधुन घातला कसा काळजावरी विळा

उभार बांध्यामधुन उमटला जरा उभट हा गोल गळा
तुझ्या भुजांवर रुतून बसला गच्च कानडी खण पिवळा

ठाय पावलें घाय घालती केळफुलांची त्यांस कळा
तुझ्या गतींतुन निर्झरणीचा खळाळ फुटतो खळाखळा

निघतां निघतां हसून बघतां असा लावला कसा ळळा
अलाबला अलवार जिवाची तुझी मला अन् माझी तुला

उजाड माझ्या वैराणावर कोसळला ग ऽ पाणकळा
सुकला होता माळ त्यावरी पिकला माझा पानमळा !

## नाजुक रुपडें

नाजुक रुपडें ठाकठिकीचें संभावित टाकमटिकली
किती पाहिली तरी निवेना नजर आमुची वखवखली

चोळीवरतीं सोळा ऐने, आठांना दुनिया दिसली
नजर जराशी घुटमळली तों पदर चोंबडा करि चुगली

ओठटिपीची रुमाल इवला घडी तयाची धुसमटली
हळहळ वाटुनि हृदय म्हणालें हाय तुझी जागा चुकली !

झुलणारी शेलाटी कंबर पीतांबर बळकट कसली
तकतकतां केतकी पोटऱ्या वीज नसांमधुनी घुसली

झणत्कारतां तुझीं पावलें कानांना पानें फुटलीं
तुला पाहतां एक पापणी शिणली अन् अलगद मिटली

सन अठराशेंमधीं पुण्याला भेट जर कां असती घडली
धडगत नव्हती तुझी साजणी ! हुकली गऽ संधी हुकली !!

## ऋतुराजांनो

ऋतुराजांनो,
तुम्ही सृष्टिचे भाग्यविधाते
चराचराचे जीवनदाते
तुमच्या नीरव तालावरती
धरती अपुलीं गीतें गाते

–कुहू–कुहूंच्या सीत्कारांनीं रंगवलेलीं
–भणाणणाऱ्या आवर्तांतुन भिरभिरलेलीं
–कपिशपिंगला वीज जयांतुन हसली हसली
–श्रावणांतली जलधारा मुसमुसली
—खळाळणाऱ्या लेझिम्नें थरथरलीं
—पौषाच्या अश्रूंनीं भिजलीं
—शुष्कपर्ण रानांतच थिजलीं, मूक जहालीं
असलीं गीतें
युगानुयुग ही धरती गाते

कुहू–हाय–कड–रिमझिम–लेझिम–चकमक–टपटप
कधिं लोभस, कधिं चंचल, आतुर, उत्सुक, उन्मद,
केविलवाणें
गाते धरणी अक्षय गाणें
त्या गाण्याचीं रुजलीं बीज
चराचरांतुन, कणाकणांतुन, हृद्‌गर्भांतुन
चक्रधरांनों, तुमच्या स्पर्शें
अमुची धरणी, अखंड तरुणी, गाते गाणीं !

अगा ऋतूंनो
मीही तुमचें मूल, वाढलों तुमच्या प्रेमळ अंकावरतीं
तुम्हीच ना रसगंगाधर हो
फुलाफुलांच्या हातांवरतीं
मज आंदुळलें मज जोजवलें ?

या देहाच्या अणुरेणूंतुन
छंद अयाचित नाचत राही
आणि मनाच्या नसानसांतुन
अद्‌भुत जें रसरसलें कांहीं
ती तुमची किमया, ती माया
प्रकाश तुमचा तुमची छाया

तुमच्या स्पर्शें
गातों शापित गंधर्वापरि
तुमच्या स्पर्शें
मी पुलकित, मी कंपित वीणाझंकारापरि

सहा सख्यांनो
तुम्ही कृत्तिका, कार्तिकेय मी तुमच्या प्रेमळ अंकावरतीं...

अगा ऋतूंनो, चक्रधरांनो, रसराजांनो
असा कसा परि दुजाभाव नित मज दाखवितां ?
पक्षपात कां भलतासलता ?
कुहूकुहू रिप रिमझिम यांच्या
सुरांत ना ये सूर मिळवितां

माझें गाणें चंद्राच्या राज्यांत हंसेना
सूर्याच्या तापांत रुसेना
धरणीच्या तालांत बसेना
आषाढांत कधीं बरसेना
श्रावणांत तें पंखच मिटुनी बसतें
आश्विनांत तें हिमसरितेपरि थिजतें
वसंतांत तें सघन नभापरि झुकतें
असा कसा हो दुजा भाव मजवरती ?
मी तर तुमचें मूल, वाढलों तुमच्या प्रेमळ अंकावरती

* *

कधीं पाहतों,
तांबडमातीमधुनी उठतें हिरवें गाणें
जीर्ण तरूंवर पोपट फुटती गोजिरवाणे
पुष्पपरागसुगंधित वारा
हळूच उघडुनि दक्षिण दारां
कामिजनांच्या मनामनाच्या
छेडुनि जाई आतुर तारा
वनावनांतुन उद्यानांतुन
फाग घालितो नाजुक हांका
त्या हांकेनें
कुंपणावरी घाणेरीचे गाल लाल होतात तिथें
मग काय नवल कीं
फुलबागेंतिल नाजुक साजुक लजवंतींनीं
यौवन मादक उधळुन द्यावें !
(प्राप्ते षोडषवर्षे कीं म्हणतात कायसें –)

गन्धवतीला अंकुर फुटती लाख ठिकाणीं
चराचराला होते इच्छा
रसरसुनी बेभान फुलावें
अनिर्बन्ध निःसंग रमावें
रमत फुलावें
फुलतां फुलतां नकळत नूतन निर्मुनि जावें
अगा ऋतूंनो, सुखसंवादीं या धरतीच्या
विसंवाद मी—
मनांत माझ्या तप्त सहारा
फुटते लाही, जळती दाही दिशा मनाच्या
निळ्या नभःकृष्णाच्या हातीं
लखलख करितें सोनसुदर्शन
मातीमधुनी वसंत माते
ग्रीष्म मला परि देई दर्शन

*　　　　*

कधीं पाहतों
खरेंच येतो ग्रीष्म जेधवां अग्निपरायण
खरेंच येतो फिरवित अपुली द्वाही जणुं तेजोनारायण
काजळलेल्या कड्याकड्यावर
गडागडावर रोवित अपुले ध्वज तेजाचे ...
धुळीस जेव्हां आठवतें कीं
होतों आपण ज्वालामुखिच्या गर्भी
घारीलाही येते जेव्हां घेरी
खडी फोडतां
वडारही छातींत फुटे ज्या काळीं

तापांतिल वा महारपोरीऐशी
माती मागे दारोदारीं पाणी
पाणी पाणी करिते चिंव चिंव चिमणी
आणि मारिते कांचेवर खिडकीच्या
तडफडणारी चोंच, पंख फडफडते...

त्या ग्रीष्माच्या ऐन दुपारीं माझ्या
मनांत भरते आषाढाची धुंदी
मनांत माझ्या धार मृगाची संतत झडते
काजळतें नभ ऐन दुपारीं
मनांत माझ्या जळवंती अभिसरते

रसराजांनो,
धरतीच्या अन् तुमच्या सुखसंवादीं
विसंवाद मी होतों,
दुजाभाव हा तुमचा भलता सलता

* *

कधीं पाहतों—
खरोखरी मग आषाढस्य प्रथमे दिवसे
कडाडतो हा स्थाणू ब्रह्माण्डाचा
नरसिंहाची जिव्हा लळलळते अन्...
प्रल्हादाच्या नयनीं करुणाधारा...

चिमण्या भिजती थंडीनें थरथरती
परि आनंदें चंचूही वर करती

अन् शेतांची रोमांचित हो छाती
अन् तृप्तीनें निःश्वसते ही माती
सगंध होतीं दहा दिशांचीं नातीं
जडावलेली तृप्तीनें जरि धरती,
पुनःपुन्हां ती मागत चुंबनदानें
पुनःपुन्हां ती रसरसते मस्तीनें
गढूळ तांबुस होती उन्मद नयनें
चाहुल येतां गर्भाची बीजाची
मिटते डोळे
अन् अनुभवते गात्रागात्रामधुनी
श्रावणसरि ज्या रिमझिम बरसत येती ...

मात्र माझिया मनांत तेव्हां उमले
कोजागिरिचें स्वप्न मुलायम शुभ्र
माझ्या मनिंच्या गङ्गातीरावरती
पंख पसरती गीतांचे कलहंस
माझ्या मनिंच्या बागमळ्यांतुन तेव्हां
पक्क फळांचा, सोनपिकांचा गंध

*   *

मात्र पाहतों कधीं कधीं मी जेव्हां
स्नात दिशांचीं आरसपानी अंगें
नभांत उडती राजहंस मेघांचे
पिकांत भरल्या
माचीवरुनी येतो गोफणगुंडा
तरंग उठवित शेतावरुन शुकांचा

आणिक उठती
गंध गहू लोंब्यांचे, गंध उसाचे
गुऱ्हाळांतल्या तप्त कटाहांचे ते
त्यांत मिसळती श्वास खमंग मधाळ

होती जेव्हां
दिन सोनेरी रात्र रुपेरी
पहाट ओली कंपित गहिरीं
अंवसेचीही सुंदर दिसते रात्र
तृप्त नदीचें स्फटिकापरि हो पात्र
आणि धरित्री होय पुरन्ध्री जैशी
श्यामेपरि ती समशीतोष्ण सुखाची

त्यावेळीं या मनांत, ऋतुराजांनो,
थिजुनी बसतें कंठामधलें गाणें
ऐकत असतां लेझिम तें पुनवेचें
झडतीं माझ्या मनांत पानें शुष्क !

*    *

कधीं पाहतों मात्र खरोखर जेव्हां
हिमालयाची छाया पडते वातावरणीं
राख घालुनी माथ्यावर, रांगेनें
उभे शाल्मली टक लावुन आभाळीं
अशी तपस्या त्यांची चाले
मान न हाले
पक्षि न बोले

थिजली वाणी वाचाळहि वाऱ्याची
निजली सृष्टी
उन्हें आलिं तरि
माथ्यावरती शाल तिच्या पाऱ्याची
नीरव झाले निर्झर
नीरव पानें
गळतीं पानें सुन्नपणें असहाय
गोठुन गेलीं घरट्यामधलीं अंडीं
असली थंडी गाजविते सुलतानी !

मात्र माझिया मनांत येती झुळका
आणि आणतो वसंतवारा वार्ता नवसृजनाच्या
मनांत माझ्या
आम्रफळें रसरसती
मनांत माझ्या कुहूकुहूंची गीती
मनांत माझ्या
प्रेम चालतें पक्ष्यांचें, वृक्षांचें,
मनांत माझ्या वैभव ये यक्षांचें
मनांत माझ्या
वसंत करतो जंतर मंतर
घालुनि फुंकर
जाइजुईना देत दिलासा येतो
सृष्टीसह तो रंगविलासा येतो

ऋतुराजांनो, चक्रधरांनो, रसराजांनो
पुष्पफलांच्या, रविचंद्रांच्या

दिनरात्रींच्या संवादाहुन
कसें निराळें केलें हें मन ?
असा कसा हो दुजाभाव हा भलतासलता ?
मी तर तुमचें मूल, वाढलों तुमच्या प्रेमळ अंकावरतीं ...

*          *

होय समजलों —
मी तुमचा लाडेला झालों
मी तर तुमचा पोर लाडका
मी अलबेला छेलछबेला
मी तुमचा चिरतरुण अरुण अन्
मी तर तुमच्या आगमनाची भेरी
मी तुमच्यांतिल गोफ रेशमी
तुमच्या गीतांसाठीं होतों आधीं वीणा
माझ्या तारा छेडुनि क्षणभर आधीं
त्याच सुरावर गातां तुमचीं गाणीं
रहस्य हें तुमच्या–माझ्यांतिल
आज उमगलें आज उकललें
व्याकुळ होतां आकळलें मज सारें
वृथा लाविला बोल तुम्हां ऋतुराज

मी तर तुमचें मूल, वाढलों तुमच्या प्रेमळ अंकावरतीं
चैतन्याची तुमच्या वीणा मीं व्हावें ही होती नियती

## प्रियंवदा

स्थळ : मालिनीतीर
काळ : वैशाखी दुपार
व्यक्ति : अनसूया; प्रियंवदा

**अनसूया :** प्रियंवदेऽ, प्रियंवदेऽ,
... गेली तरि बाइ कुठें ...
अवखळ ही अजुन अशी ...
शोधु कुठें आणि कशी ...
गौतमिच्या अंगणांत
पाहुन झालें
माधविच्या मंडपांत
शोधुन आलें ...
प्रियंवदेऽ ...
पियु पियु गऽऽ
मैत्रिणि गऽ ऐक सये
असशिल ना तेथुन ये
शपथ तुला
या वेड्या अनशीची

**प्रियंवदा :** ही मी होतें इथेंच
ही मी आहें इथेंच
( राहिन अन् मी इथेंच ... )

अनसूया : मालिनिच्या तीरावर
एकटीच कां आलिस ?
वेळूंच्या या वनांत
वेगळीच कां झालिस ?
शकुन् इथें असतांना
नव्हती कधिं करित असें –

प्रियंवदा : होय बरें ... मीच खुळी
लागलें मलाच पिसें ...

अनसूया : रागवूं नकोस गडे ...
होतिस तरि काय करित ?
पाण्याच्या गाण्याला
होतिस कां ताल धरित ?
बकुळीचा हार इथें
कां अर्धा पडला ग ?
पियू, तुझ्या लोचनांत
आंसूं अवघडला ग ...

प्रियंवदा : आंसूं ? माझ्या नयनीं ?
शकुन्तला मी न खुळी
आश्रमांत म्हणति मला
प्रियंवदाऽ सदाफुली !
मी हसते हासवते
मी अचपळ अवखळ मी
जळ माझ्या लोचनांत ?
मजला गऽ काय कमी ?

**अनसूया :** सोंग पुरे ... ढोंग पुरे ...
शपथ तुला आहे पियु
आवडत्या हरणांची
शपथ जुई वेलींची
तातांच्या चरणांची
शकुन्तलेच्या चिमण्या –
–नच दिसल्या बाळाची...
शपथ शपथ
वेडी मी...परि तुझीच...
खुपणारें सांग गुपित...

**प्रियंवदा :** कांहीं तरि प्रश्न तुझे !
वेडी तूं अनसूये ...
सांगणार नाहीं तुज
काय असें गुज सखये ?
...नाहीं ग गुपित तसं...
...आज हवा पाहिलीस ?
–ऊन कसें हसताहे
धरणी ही रोमांचित...
गगन कसें पुरुषासम ...
दाहि दिशा त्या अंकित
आज कमलकोशांतुन
मधुर डंख भ्रमरांचे
भिरभिरते पाकोळी
हाल करित सुमनांचे
वारा निःस्तब्ध जरी...

मधुनी सुटतो सुसाट
केळी-बन झोडपतो
दुष्यन्तापरि पिसाट

**अनसूया :** शांत जरा होइ पिया...
शांत शांत शांत शांत
झालें तरि काय तुला
थरथरसी नखशिखांत

ग्रीष्माचा दिवस असा
घामेजुन भाल जाय
शिशिरांतिल नलिनीसम
कांपते तुझीच काय

चल वेडी ... ऊठ इथुन
चल लवकर आश्रमांत
सारेजण शोधतील
चिंता करितील तात

**प्रियंवदा :** जाऊं गऽ...थांब जरा
थांब जरा निमिषभरी
मी तर नाजूक अशी
ऊन हें असें जहरी

ही बघ ना...हीच शिला
राजाची शय्या ही
चुरलेल्या कुसुमांचा
गंध अजुनही वाही

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 29553 वि: 9105
क्रमांक 9349 नों: दि: 26।6।58

—आठवतें ?
ग्रीष्मांतिल ती दुपार
दिवस जरा कललेला
मालिनिच्या पाण्यावर
कवडसा न हललेला
शांत शुक्र कुंज हाच
शकुंतला थरथरती
तो अकालदुर्दिन अन्
ती जडावली धरती...

**अनसूया :** शोभलें तया सारें—
—क्षत्रियवर तो नृपती
सुरयुवतीसंभूता
गाधिजमुनितनया ती

**प्रियंवदा :** जा बाई—तूं अशीच—
सांगूं कां एक तुला...
उमलुं नको म्हणशिल कां
तूं इथल्या रानफुलां ?
अनसूये ! कमलांपरि
उमलतात रानफुलें
झुलणाऱ्या आम्रासह
निंबाचें झाड झुले
जाऊं दे...अनसूये...
हांसुं नको, ऐक तरी—

माझ्याही चोळीची
सैल जरा गांठ करी

**अनसूया :** शांत पिया...शांत जरा...
...हा आश्रम...या आपण....
समिधांनीं जळण्यांतच
समिधांचें समिधापण ..

**प्रियंवदा :** कळतें ग कळतें मज...
काल काय झालें पण
मी आलें बागेंतुन
आणि मोर षड्जांतच
ओरडला वेडावुन—

अनसूये, तूं न कधीं
पाहिलास काळवीट...
हरिणींच्या अंगांशीं
घुसळित जो अंग धीट ?
काळवीट ! करुणामय !
हरिणींचा एक सखा...
अनसूये, महाराज
परतुनि कधिं येतिल कां ?

—अजुनी तें चित्र पुढें ...
हाच ग्रीष्म ... ही दुपार ...
... हाच कुंज अनुभवीक ! ...
... पाण्याला हीच धार ...

**अनसूया :** पियु माझी ! वेडी तूं !
तू मी तर मुनिदुहिता
तातांच्या हातांतच
निरखूं या आत्महिता...

**प्रियंवदा :** तातांच्या हातांतच —
—विसरलेंच अनसूये...
शाङ्गरवांचे कधिं तूं
पाहिलेस हात सये ?
त्यांचे ते पुष्ट हात...
त्यांचा कर्पूरवर्ण...
त्यांचें तें रुंद भाळ...
आणि जटांतिल सुवर्ण...

[ **गौतमीचा आवाज :** प्रियंवदेऽऽ, अनसूयेऽऽ ]
अनसूये, आठवतें ?
हें असेंच दूरावर
गौतमिचें पाउल तें
वाजतांच पानांवर...
चक्रवाकवधुकेला
मीं म्हटलें 'सावधान'
चक्रवाकवधुका ती...
...मी कुठली भाग्यवान !

**अनसूया :** तें सारें चुकलें ग...
वणव्यापरि आला तो

चक्रवाकवधुकेला
जाळुन तर गेला तो
गौतमी शहाणी बघ ...
गौतमिचे शब्द खरे
वेड सर्व ओसरतां
शून्याविण काय उरे !

**प्रियंवदा** : तो वणवा ... तें वादळ
तें जळणें ... तेंच खरें

रात्र असावी गहिरी
स्तब्ध पडावा वारा
तिमिराच्या शीर्षावर
एक असावा तारा
आठवून वणवा तो
संथ जळावें आपण
अश्रूंच्या ओझ्यानें
मूक मिटावे लोचन ...

अनसूये ... हरलों गऽ ...
श्रेय इथें काय निघे ?
तूं ... मी ... साऱ्याच जणी
बीजांतिल गौतमि गे !
अनसूये
हरलों गऽ हरलों गऽ
हरलों गऽ,.....

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९६०३
ग्रंथ शाखा

REFBK-0009403
REFBK-0009403



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम 29663 दि: 411021
क्रमांक 93609 नों: दि: 26/6/58